१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार ९ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-६५, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 65 Marathi - Daily - Mumbai, 9 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

निदा खान अखेर अटकेत! ४० दिवसांनंतर पोलिसांनी कसं पकडलं?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# सुवेंदुंवर धाड पडली! भाजपात प्रवेश! ममता विरोधात उमेदवार थेट मुख्यमंत्रीपद! भाजपाची नेहमीची रणनीती

■ कोलकाता

**भाजपाने** पश्चिम बंगालचे पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि ओडिशाचे मोहन शरण मांझी आज दुपारी कोलकात्यात पोहोचले. त्यानंतर विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर अमित शहा यांनी सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून घोषणा केली आहे. अमित शहा म्हणाले की, विधिमंडळ नेत्याच्या नावासाठी जवळपास आठ प्रस्ताव मिळाले. त्यात एकच नाव होते. दुसऱ्या नावासाठी पुन्हा वेळ देण्यात आला. मात्र दुसरे नाव आले नाही. त्यामुळे केंद्रीय पर्यवेक्षक म्हणून सुवेंदू अधिकारी यांना पश्चिम बंगाल विधानमंडळाचे नेते म्हणून घोषित करण्यात येत आहे.

अधिकारी उद्या सकाळी ११ वाजता कोलकाता येथील 'ब्रिगेड परेड ग्राउंड'वर मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्यासह एनडीएचे अनेक प्रमुख नेते या शपथविधी समारंभास उपस्थित राहाणार आहेत. भाजपशासित २० राज्यांचे मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित राहाणार आहेत. या सोहळ्याला ५०,००० लोक उपस्थित राहातील, अशी शक्यता आहे.

आपल्या नावाची घोषणा झाल्यावर केलेल्या भाषणात अधिकारी म्हणाले की, बंगालचा मुख्यमंत्री म्हणून चांगली जबाबदारी निभावेन. मी भाषण कमी आणि काम जास्त करेन. बंगालला सोनार बांगला बनवण्याचा प्रयत्न करेन. मी जिवंत आहे, तोपर्यंत घाबरण्याची गरज नाही. बंगालमधून आता भय निघून गेले आहे आणि भरवसा आला आहे. पक्ष माझ्यासाठी सर्वात वर असेल. मोदीजींनी जेवढ्या गॅरंटी दिल्या आहेत, त्या सगळ्या लोकांना देईन.

अमित शहा यांनीही अधिकारी यांचे कौतुक करत म्हटले की, अधिकारी यांना मी » पान ७ वर

**पश्चिम बंगालमध्ये भाजपाला ऐतिहासिक विजय मिळवून देणाऱ्या सुवेंदू अधिकारी यांची राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी कोलकात्यात त्यांच्या नावाची घोषणा केली. ते उद्या सकाळी अकरा वाजता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. विशेष म्हणजे, लाच घोटाळ्यात त्यांच्यावर लाच घेतल्याचे आरोप झाल्यावर त्यांच्यावर सीबीआयने कारवाई केली आणि ते भाजपामध्ये आले. भाजपाने त्यांना ममता बॅनर्जी यांच्या विरोधात निवडणुकीच्या मैदानात उतरवले. याच अधिकारी यांच्याकडे आता भाजपाने राज्याची धुरा सोपवली आहे.**



### नारद स्टिंग ऑपरेशन काय होते?

पश्चिम बंगालमध्ये नारद समाचार पोर्टलचे संपादक मॅथ्यू सॅम्युएल यांनी केलेले नारद स्टिंग ऑपरेशन गाजले होते. एका कंपनीचे काम करून देण्याच्या बदल्यात काही खासदारांनी लाच घेतल्याचे हे स्टिंग ऑपरेशन होते. यात सुवेंदू अधिकारी यांच्यासह सौगत रॉय, प्रसून बॅनर्जी आणि काकोली घोष या तृणमूलच्या खासदारांची नावे पुढे आली होती. सीबीआयने या प्रकरणाचा तपास केला होता. सीबीआयने लोकसभा अध्यक्षांकडे या चार खासदारांवर खटला दाखल करण्याची परवानगीही मागितली होती. मात्र, सुवेंदू यांनी तृणमूल सोडून भाजपात प्रवेश केला आणि ही चौकशी थांबली.

## अखेर सत्तेचे गणित जुळले विजय तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री

**तामिळनाडूत निवडणूक निकालानंतर गेले चार दिवस चाललेल्या राजकीय नाट्यामध्ये अखेर विजय यांनी बाजी मारली. काँग्रेसच्या पाठिंब्यानंतरही बहुमताचा आकडा गाठू न शकलेल्या विजय यांना आज भाकपा, माकपा, व्हीसीके, मुस्लीम लीग आणि एएमएमके या पाच पक्षांनी पाठिंबा देऊ केल्याने त्यांच्याकडे १२१ चे संख्याबळ झाले. त्यामुळे विजय यांचा मुख्यमंत्री बनण्याचा मार्ग मोकळा झाला.**



■ चेन्नई

**तामिळनाडू** विधानसभा निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर झाला. थलापती विजय यांच्या टीव्हीके पक्षाला दाक्षिणात्य जनतेने भरभरून कौल दिला आणि पहिल्याच निवडणुकीत १०८ जागा जिंकून टीव्हीके हा सर्वात मोठा पक्ष ठरला. त्यानंतर सरकार स्थापन करण्याची कसरत सुरू झाली. सर्वात मोठा पक्ष म्हणून राज्यपालांनी टीव्हीकेला सरकार स्थापन करण्याचे निमंत्रण देणे अपेक्षित होते. मात्र दोन दिवस उलटले तरी राज्यपालांचे निमंत्रण आले नाही. त्यामुळे ६ मे रोजी विजय यांनी पहिल्यांदा राज्यपालांची भेट घेतली. मात्र राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी आधी ११८ आमदारांचे पाठिंब्याचे पत्र घेऊन या, असे म्हणत थलापती विजय यांना माघारी धाडले. दुसऱ्या दिवशी ७ मे रोजी विजय यांनी दुसऱ्यांदा राज्यपालांची भेट घेतली. पण राज्यपालांनी दुसऱ्यांदाही विजय यांना रिकाम्या हाती माघारी धाडले. त्यांच्या या आडमुठ्या भूमिकेवर विरोधकांनी टीकेचा भडिमार केला. पण राज्यपाल आपल्या भूमिकेपासून तसूभरही हलायला तयार नव्हते. त्यामुळे संतप्त झालेल्या टीव्हीकेच्या आमदारांनी आज सामूहिक राजीनामा देण्याचा इशारा दिला होता. दुसरीकडे एकमेकांचे कट्टर वैरी द्रमुक आणि अण्णा द्रमुक पन्नास वर्षांनंतर » पान ७ वर

## टीसीएस धर्मांतर, लैंगिक शोषण निदा खानला ४० दिवसांनंतर अटक

■ नाशिक

**नाशिकमधील** 'टीसीएस' कंपनीशी संबंधित महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषण आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात ४० दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या मुख्य आरोपी निदा खानला अखेर काल रात्री छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली. नाशिक एसआयटी पथकाने स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने सापळा रचून नारेगाव येथील कौसर पार्क येथून तिला ताब्यात घेतले. तिला एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी आश्रय दिल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्यांनाही



एमआयएम नगरसेवक सहआरोपी

सहआरोपी करत त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.

नाशिक पोलिसांच्या एसआयटी तपासामध्ये आरोपीला नारेगाव येथील स्थानिक » पान २ वर

### सत्य शोधन समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

टीसीएसप्रकरणी नेमण्यात आलेल्या सत्य शोधन समितीने आपला अहवाल राज्य महिला आयोगाला सुपूर्द केला असून आयोगाने तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ही माहिती दिली. मात्र या अहवालात नेमके काय निष्कर्ष काढण्यात आले आहेत, याबद्दल माहिती देण्यास त्यांनी नकार दिला. या अहवालाकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## दहावीचाही निकाल २ टक्के घटला ९२.०९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा एकूण ९२.०९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मात्र बारावीप्रमाणेच दहावीचा निकालही यंदा २ टक्क्यांनी घटला आहे. या निकालात राज्यातील एकूण १७९ विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

नेहमीप्रमाणे कोकण विभागाने सर्वाधिक निकाल देत परंपरा कायम राखली आहे, तर छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल सर्वात कमी आहे. तर मुलींनी यंदाही निकालात बाजी मारली. दहावीच्या परीक्षेसाठी राज्यभरातून १५ लाख ५५

### १७९ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण

हजार २६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ लाख ४२ हजार ४७२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यातील १४ लाख २० हजारांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलांचा निकाल ८९.५६ टक्के, तर मुलींचा » पान ७ वर

## थोडक्यात...

### मेट्रो अपघात प्रकरणी वेल्डर रामाशिषला जामीन

**मुंबई** - मुलुंडमध्ये मेट्रो मार्गिका -४ च्या कामादरम्यान गर्डर कोसळून झालेल्या अपघातप्रकरणी अटक करण्यात आलेला वेल्डर रामाशिष यादव याला सत्र न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केला. त्याची आर्थिक परिस्थिती आणि कुटुंबातला तो एकटाच कमावता सदस्य असल्याचा सहानुभुतीपूर्वक विचार करून न्यायालयाने त्याची जामिनावर मुक्तता केली. १४ फेब्रुवारी रोजी झालेल्या या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. तर तीन जण जखमी झाले. अपघात झाला त्या ठिकाणी दोन दिवसांपूर्वी म्हणजेच १२ फेब्रुवारी रोजी हा गर्डर बसवण्यात आला होता. मात्र त्याचे काँक्रिटीकरण योग्य प्रकारे न केल्याने हा गर्डर वर्दळीच्या रस्त्यावर कोसळला. यादवच्या वकिलांनी कोर्टात युक्तिवाद केला की, यादव हा मिलन रोड बिल्डटेक कंपनीत कंत्राटावर वेल्डरचे काम करतो.

### शिक्षकांचा ६० दिवसांपासून आझाद मैदानात ठिय्या

**मुंबई** - आझाद मैदान येथे समग्र शिक्षण अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी शिक्षकांचे आंदोलन गेल्या ६० दिवसांपासून सुरू असून, राज्यभरातून आलेले सुमारे ३,३७८ शिक्षक आपल्या विविध मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन करत आहेत. या आंदोलनातील शिक्षकांची प्रमुख मागणी म्हणजे त्यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे. अनेक शिक्षकांच्या सेवाकाळातील अवघी ५ ते ६ वर्षेच उर्वरित असल्याने भविष्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. जोपर्यंत त्यांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला आहे. शिक्षकांच्या या दीर्घकालीन आंदोलनाकडे सरकार कधी लक्ष देणार आणि त्यांच्या मागण्यांवर काय निर्णय होणार, याकडे राज्यभरातील शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## मनोज जरांगे पुन्हा आंदोलन करणार १६ मे रोजी तारीख जाहीर करणार

■ जालना

**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्याने आणि कर्जावरील व्याज परताव्याचा प्रश्न प्रलंबित असल्याने मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. ते १६ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची पुढील दिशा आणि तारीख जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कांदा दरातील घसरणीमुळे शेतकरी हवालदिल झाला असून, सरकारकडून ठोस निर्णय न घेतल्याची टीका जरांगे पाटील यांनी केली. ते पुढे म्हणाले की, एकजूट हाच पर्याय आहे.

सरकारकडून वारंवार विनंती करूनही न्याय मिळत नाही. आंदोलनात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ठाम भूमिका घ्यावी. सरकार किंवा कोणत्याही पक्षाच्या नेत्यांची दया-माया करून चालणार नाही. संघर्षाशिवाय न्याय मिळत नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांना व्याज परतावा वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात तरुणांमध्ये नाराजी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

## कर्नल सोफियांवर आक्षेपार्ह टिप्पणी मध्य प्रदेश सरकारवर कोर्ट संतापले

■ नवी दिल्ली

**कर्नल** सोफिया कुरेशी यांच्याबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणारे मध्य प्रदेश सरकारमधील मंत्री कुँवर विजय शहा यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची परवानगी देण्यास टाळाटाळ करणाऱ्या मध्य प्रदेश सरकारवर सर्वोच्च न्यायालय चांगलेच संतापले. अति झाले, आदेशाचे तत्काळ पालन करा, अशा शब्दात न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला सुनावले.

गेल्या वर्षी जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने



पाक पुरस्कृत दहशतवाद्यांविरुद्ध छेडलेल्या ऑपरेशन सिंदूरची माध्यमांना माहिती देण्याची जबाबदारी लष्करातील दोन महिला अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली होती. त्यापैकी एक सोफिया कुरेशी होत्या. त्यांच्या धर्मावरून मंत्री कुँवर विजय शाह यांनी टिप्पणी केली होती. त्यावरून देशभरात संतापाची लाट उसळली होती.

या प्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) मध्य प्रदेश सरकारकडे मंत्री कुँवर विजय शहा यांच्याविरूद्ध कायदेशीर खटला चालवण्यासाठी परवानगी मागितली आहे.

## टाटा ट्रस्टची महत्त्वाची बैठक लांबणीवर! आता १६ मे रोजी होणार

■ मुंबई

**टाटा** ट्रस्टची आज होणारी बोर्ड बैठक लांबणीवर टाकण्यात आली असून आता ती १६ मे रोजी होणार आहे. आजची बैठक रद्द करण्यासाठी काल मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला होता. आज अचानक ही बैठक रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, ही बैठक पुढे का ढकलण्यात आली, याचे कोणतेही अधिकृत कारण देण्यात आलेले नाही.

टाटा समूहाची मूळ कंपनी 'टाटा सन्स'ला शेअर बाजारात सूचीबद्ध करण्याच्या मुद्यावरून व्यवस्थापनात मतभेद तीव्र झाले आहेत. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा या सूचीकरणाच्या विरोधात आहेत, तर ट्रस्टचे दोन विश्वस्त वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंह रिझर्व्ह बँकेच्या नियमांचा हवाला देत आयपीओ आणण्याच्या बाजूने आहेत. रिझर्व्ह बँकेने शॅडो बँकांसाठी नियम कडक केले आहेत. १ जुलैपासून टाटा सन्सला 'सिस्टिमॅटिकली इम्पॉर्टंट शॅडो बँक' म्हणून नियुक्त केले जाईल. त्यामुळे कंपनीला सार्वजनिकरित्या सूचीबद्ध करणे अनिवार्य होईल. रिझर्व्ह बँकेने २०२२ मध्येच टाटा » पान ७ वर

**उत्तर प्रदेश सरकारने प्रत्येक जिल्ह्यातील एक सर्वात लोकप्रिय पदार्थ घेऊन सर्व ७५ जिल्ह्यांची यादी तयार केली आहे. वन डिस्ट्रिक्ट,वन क्विझिन (ओडीओसी) अर्थात एक जिल्हा, एक वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ असा हा अनोखा उपक्रम आहे. प्रत्येक जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांचा संपूर्ण राज्यात प्रसार व्हावा या उद्देशाने सरकारने ही मोहीम हाती घेतली आहे. मात्र यात लखनौचे गलावटी कबाब, अवधी बिरयानी अशा लोकप्रिय मांसाहारी पदार्थांना स्थान देण्यात आलेले नाही. त्यावरून या मोहिमेवर टीका होऊ लागली आहे.**

## उत्तर प्रदेशच्या खाद्य संस्कृतीत मांसाहारी पदार्थांना स्थान नाही

■ लखनौ

**गलावटी** कबाब आणि अवधी बिरयानी हा उत्तर प्रदेशच्या खाद्य संस्कृतीमधील प्राचीन वारसा




आहे. असे असताना या पदार्थांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने हॉटेल उद्योगातील नामवंत आचारी व उत्तर प्रदेशच्या प्राचीन खाद्यसंस्कृतीचा मागोवा घेणाऱ्या इतिहास संशोधकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओडीओसी यादीत आग्र्याचा पेठा, मथुरेचा पेढा, मिरतची रेवडी, वाराणसीचे बनारसी पान, अयोध्येची

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कचोरी या पदार्थांना स्थान देण्यात आले आहे. खरेतर प्रयागराज आणि वाराणसी रस्त्यांवर विकल्या जाणाऱ्या चविष्ट मांसाहारी पदार्थांसाठी ओळखले जातात.

## डोकाडिया कुटुंबाच्या घरात सापडलेले औषध उंदिर मारण्याचे नाही

■ मुंबई

**मुंबईतील** पायधुनी परिसरातील डोकाडिया कुटुंबातील चार जणांच्या मृत्यू प्रकरणाचे गूढ अधिकच गडद झाले आहे. फॉरेन्सिक अहवालानुसार या चौघांचा मृत्यू अन्नातून नव्हे, तर विषारी पदार्थामुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर डोकाडिया कुटुंब राहत असलेल्या घरात उंदीर मारण्याचे औषधा सापडल्याचे सांगितले जात होते. परंतु आता अशी माहिती बाहेर आली आहे की, डोकाडिया कुटुंबियांच्या घरातून सापडलेले उंदराचे औषध हे उंदीर मारण्याचे नसून उंदीर पळवण्याचे आहे. उंदीर पळवण्याच्या औषधात झिंक फॉस्फाइड नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे आता पायधूनीतील चौघांच्या मृत्य प्रकरणात नवीन ट्विस्ट आला आहे.

डोकाडिया यांच्या घरात सापडलेला उंदीर पळवण्याचं औषध नैसर्गिक पेपरमिंट-आधारित द्रव्य आल्याची माहिती देण्यात आली आहे. तर चौघांच्याही शरीरातून तसेच कलिंगडाच्या नमुन्यात एफएसएलच्या तपासणीत झिंक फॉस्फाइड आढळले होते. मग झिंक फॉस्फाइड डोकाडिया यांच्या घरात आले कुठून, असा सवाल उपस्थित झाला आहे.



# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

सतगुरू इंटरप्राईज कंपनीकरिता विलेपार्ले येथे नामांकित शाळा / कॉलेज मध्ये त्वरित प्यून पाहिजेत. (वयोमर्यादा-४५ वर्षापर्यंत) पत्ताः- 414-E / 4 था माळा, झी-शान, opp. सनसिटी सिनेमा, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व) Email: satguruenterprise1@gmail.com, **9326007480 / 9820426010** {NC260436}

किमान २ वर्षांचा अनुभव असलेला पुरुष उमेदवार हवा. विरार कार ॲक्सेसरीज शोरूमसाठी संपर्कः- **9834141058** {NC260442}

बांद्रा (पूर्व)/ठाणे (माजिवाडा) येथे फ्लॅट साफसफाई कामासाठी मुले / मुली पाहिजेत, सुपरवाईझर पाहिजे. पगारः- 15,000/- सुपरवाईझर :- 20,000/-, **7028463942** {NC260445}

बांद्रा ते भाईंदर विभागाकरिता गॅस मीटर रिडींगसाठी मुले पाहिजेत. per visit 30/- **9820385767** {NC260452}

10/ 24 तास होम पेशंट ड्युटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला PER DAY. **9372767739 / 8452061740** {NC260458}

मुंबईत हॉटेलमध्ये मोरी, कपडा आणि वेटर पाहिजे राहणे-खाणे मोफत संपर्कः- **9869474850 / 8097558062.** {NC260459}

सिक्युरिटी गार्ड हाऊसकिपिंग डिलिव्हरी बॉय, माळी, प्लंबर लेडीज जेन्टस गोरेगाव, मालाड- **8097507698** {NC260460}

गोरेगाव येथे त्वरीत जागा भरणे आहे. स्टोअरकिपर आणि हाऊसकिपिंग सुपरवायझर, संपर्कः- **9987328717 / 02224228330** {NC260414}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

## पाहिजेत

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरित मुले पाहिजेत. फोर्ट, दादर, लोअर परेल, वडाळा, नवी मुंबई, दररोज रोख 800/- + प्रवास खर्च - कॅशमध्ये मिळेल. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School. Chirabazar, Mumbai-400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC260011}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260448}

**UV OPERATOR**
**GRAFICA UV MACHINE**
युवी ऑपरेटर हवा आहे.
२२९, ए टु झेड इंडस्ट्रीयल इस्टेट, लोअर परेल
**9819176569**

दादर येथे कंपनीसाठी फ्रेश B.com Lady Account Assistant पाहिजेत. Tally Word Excel आवश्यक. संपर्कः- **02224228330 / 9987328717** {NC260416}

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यकता आहे 1) स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर 2) पंचिंग मशीन ऑपरेटर 3) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर 4) हेल्पर आणि फ्रेशर 5) ग्राफिक DTP ऑपरेटर. फोकस, 22 (ए)1, हकोबा कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमिल, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) येथून 5 मिनिटे चालत. फोन- **9819900505** {NC260456}

Bhiwandi मधील SM74 2 Color मशीनसाठी अनुभवी Printer आणि Cutting मशीनसाठी ऑपरेटर पाहिजे. Mob. No.:- **9819453956/ 7045363180** {NC260360}

### -: वाचकांना सूचना :-

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

## पाहिजेत

हॉटेलसाठी माळी कामासाठी पुरुष पाहिजे. जैतापूर (राजापूर). 10K + राहण्याची सोय. **9819439898** {NC260461}

कांदिवली (वेस्ट) पेस्ट कंट्रोल कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले पाहिजेत. **9029181030** {NC260356}

अनुभवी (पार्ट टाईम अकाऊंटट) तसेच वॉर्ड बॉय, नर्सेस पाहिजेत. भेटा- डॉ. खंडेपारकर नर्सिंग होम, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, दादर पूर्व मुंबई-४०००१४. वेळ - सकाळी ११.०० -१२.३० आणि सायंकाळी ७.००- ८.३०. email- apply.knh@gmail.com {NC260409}

अलिबागयेथील रिसॉर्टकरिता 1) इलेक्ट्रिशियन पाहिजेत 2) गार्डनसाठी अनुभवी माळी पाहिजे. भेटा (12 ते 2 पर्यंत)- नार्वेकर कंपनी, अजंता अपार्टमेंट, कुलाबा बस स्टेशन/ ससून डॉक शेजारी, कुलाबा, मुंबई. {NC260396}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकींगसाठी मुले व मुली पाहिजे. जयगणेश मेटल प्रिंट, गाळा नंबर-६, बबनमिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105/ 8879772701** {NC260204}

स्क्रीन प्रिंटर आणि स्टॉपरमॅन पाहिजे. जय गणेश मेटल प्रिंट, गाळा नंबर-६, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105/ 8879772701** {NC26020}

प्रिंटिंग प्रेस बाईंडिंग विभागासाठी बाईंडर आणि हेल्परची आवश्यकता आहे. पत्ताः B-205, श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, जय कोच, गोरेगाव (ईस्ट), मुंबई. संपर्क कराः **9664073035** {NC260328}

शिपिंग कंपनीकरिता ऑफिस बॉय (वय २५ वर्षांपेक्षा कमी) सीव्ही ईमेल करा ops@aindley.com Mob- **9819619626** {NC260372}

मुंबईमधील नामांकित कॉन्ट्रॅक्टरला फक्त मुंबईतील साईट करताच. इलेक्ट्रिशन, वायरमन, व हेल्पर त्वरित पाहिजेत पगार व गाडी भाडे दिले जाईल. संपर्क- **9819178977** {NC260370}

कोमोरी फोर कलर प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, पेपर कटिंगसाठी बाईंडर, पंचिंग मशीन व लॅमिनेशन मशीन ऑपरेटर पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो. नं. **9167736969** {NC260451}.

## पाहिजेत

Tally Operator आणि सेल्समन कमीत कमी 2 वर्षांचा अनुभव पाहिजे व Tally Prime चा अनुभव पाहिजे. मोबाईल - **9324706797 / 9821232807** {NC260400}

पॅथॉलॉजी लॅबसाठी रक्ताचे नमुने पिक-अप आणि ड्रॉपसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार + पीएफ + मेडिकल बेनिफीट संपर्कः- **9321982254** (हितेश ठाणेकर) {NC260433}

URGENTLY REQUIRED FOR A LEADING NEWSPAPER ADVERTISING AGENCY
CSMT (FORT/VT) MUMBAI
**GRAPHIC DESIGNER (Male / Female)**
✓ Minimum 5-6 years exp. in CorelDRAW & InDesign
✓ English Speaking and Writing is must
✓ Exp. should be in Newspaper Advertising Agency only
✓ Relevant Experience in Public Notice, IPO related, UFR, Overseas, Creative & Stat. ADVT, etc...
SALARY DEPEND ON EXPERIENCE & ELIGIBILITY
**Mob: 9819922665**
Email: sa.1966@rediffmail.com

''कालबादेवीमध्ये ऑफिस कामासाठी SSC (पास/ नापास) मुली पाहिजे (वयः 18-25)'' :- **9820338880** {NC260421}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजेत डिलिव्हरीबॉय, डीटीपी ऑपरेटर, अकाऊंटंट. संपर्कः- क्रियेटिव्ह आर्ट, युनिट 41, ओल्ड रामगोपाळ इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकिजसमोर, डॉ. आरपी रोड, मुलुंड (पश्चिम) **9892270217 / 8976167616 / 9222806020** {NC260434}

ड्रायव्हर पाहिजे, कंपनीच्या ऑफिससाठी, कायमस्वरूपी, सर्व फायद्यांसहित. उत्तम वेतन. 30,000/- संपर्कः- **9324804788** {NC260444}

कांदिवली (प) ऑफिसच्या/ हाऊसकिपींग आणि बाहेरच्या कामासाठी ऑफीस बॉय पाहिजे (शिक्षण बारावी पर्यंत) तसेच साईट सुपर वायझर (शिक्षण ग्रॅज्युएट पर्यंत). बायोडेटा टपाल किंवा ईमेल करा किंवा ऑफिसमध्ये 11 ते 7 मध्ये देऊन जा. ऑफीस ॲड्रेस- 101, बालाजी आरकेड, एस.व्ही. रोड, कांदिवली (प.), मुंबई 400067, ईमेलः workatji_group@yahoo.com {NC260318}

मुंबईस्थित प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला मुंबई आणि नवीमुंबई येथे वॉटर प्युरिफायर व एअर कंडिशनरच्या दुरुस्ती आणि सर्व्हिसिंगसाठी अनुभवी / अननुभवी पाहिजेत. संपर्कः- **9372756041 / 8355838996 / 9222226768** {NC260479}

## पाहिजेत

महाराष्ट्र मध्ये फर्निशिंग कापड मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे, वय-21 ते 25 संपर्कः- **9821254579** {NC260477}

प्रभादेवी येथील ऑफिसमध्ये आऊटडोअर कामासाठी ऑफिसबॉय पाहिजे. पगार 12,500/- + ओव्हरटाईम. संपर्कः- **7400030597** {NC260472}

CCTV टेक्निशियन पाहिजेत. कांदिवली **9920653049** {NC260473}

इमिटेशन कामासाठी मुली. आकर्षक पगार, स्टेशनजवळ, वसई (ईस्ट). **9773156336 / 9664258154** {NC260474}

बोरिवली (इस्टमध्ये) इमिटेशनच्या कामासाठी मुली पाहिजेत. संपर्कः- - **9223365501 / 8850072946** {NC260476}

हेल्पर पाहिजे पगार- 450/- ८ तास, २ तास, ओव्हरटाईम आवश्यक आणि रविवार भरून मिळेल. आनंद प्रिन्टर्स प्रा. लि.,- 44, बिंदल इंडस्ट्रीज साकीनाका. मो- **9323193046** {NC260475}

5-6 वर्षे अनुभवी PWD इलेक्ट्रिक वायरमन त्वरित पाहिजेत. (पगार-18000-20000) PH- **9223268970 / 9821244685** {NC260014}

2 कलर प्रिंटिंग मशीनसाठी प्रिंटर कम सुपरवाईझर पाहिजेत. पगार- 30,000/- फिक्स, मोबाईल- **8604390380** {NC260470}

बोरिवली वेस्ट येथे ऑफिस असिस्टंट मुलगी / लेडीज पाहिजे पगार (12000/-): **9769964468** {NC260469}

पाहिजेत टर्नर, फिटर कम, वेल्डर डायमेकर भेटाः- ए-४६ गिरीराज इंडस्ट्रीअल इस्टेट, महाकाली रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०००९३ मो. **9867145257** {NC260468}

झेरॉक्स दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे- ठाणे **9324783022** {NC260467}

चालती, लेडी पेशंट साठी बाई, मुलगी पाहिजे. बोरिवली, Mumbai **9821158093** {NC260466}

घाटकोपर ड्रायव्हर पाहिजे. (वय- 30-50) पगार- 25,000/- Contact : **9820553885** {NC260465}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

टॅली आणि एक्सेलमध्ये एंट्री करण्यासाठी भाईंदरला वॅकन्सी. संपर्कः- **9324555178** {NC260490}

## पाहिजेत

सांताक्रूझ पूर्व ऑफिसमध्ये बाहेरील कामासाठी पार्टटाईम मुलगा पाहिजे आहे. मो. **8652726044** {NC260480}

प्रिंटिंग प्रेससाठी बाईंडर, ड्रायव्हर, हेल्पर शिवम ट्रेडिंग **9820025180** nk **9320325454** संजय कॉटनग्रीन {NC260481}

पालघर जिल्ह्यातील विरार (पूर्व), पारोल फाटा येथील 'कृपा आर्ट पॅकेजिंगसाठी ५ प्लाय ऑपरेटर टीम आणि डिझायनर पाहिजे. **9820012278** {NC260482}

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

दहीसर चेकनाका, मीरारोडमध्ये हेडलबर्ग SORMZ (टूकलर) न्यूमेटिक अलकलरसाठी प्रिंटर, फिडरमन, बॉयलर आणि पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. संपर्कः- **9892318008** {NC260484}

बांद्रा ते चर्चगेट एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **9820385767** {NC260485}

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये साफसफाई इतर कामासाठी लेडी प्यून पाहिजे, वय- 35. वेळ- (9.45 - 6.15) पगार- 12,000/- शिक्षण- दहावी. ॲडव्होकेट जैन- **9820113939** {NC260486}

मुंबईत एका माणसाचे जेवण बनवण्यासाठी महिला पाहिजे. राहण्या + जेवणाची सोय मुंबईमध्ये **9324774986** {NC260488}

इलेक्ट्रॉनिक कंपनीमध्ये सोल्डरिंग आणि असेम्बलिंगसाठी मुले आणि मुली पाहिजेत. Address - घाटकोपर वेस्ट, असल्फा मेट्रो जवळ, संपर्कः- **9819335501** {NC260487}

ग्रँट रोड येथे राहणाऱ्या महिलेसाठी, घरकाम करणारी बाई पाहिजे. **9820081668** {NC260491}

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर, हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **7208004613/14** {NC260492}

प्युन पाहिजे-मुलुंड येथील ऑफिस करिता. संपर्कः- WhatsApp- **9820273124** {NC260493}

## Situation Vacant

"Pravas Foundation Required Experienced Social Media & Digital Marketing Candidate @ Uttan. Bhayander (West)" . WhatsApp CV to:- **8169948342** {NC260464}

Required female Data Entry Operators in Naigaon (West) **9834009073 / 9561632492** {NC260457}

Reqd Tally operator with accounting knowledge at our Kandiwali West office. Call: **9820080461** {NC260369}

SDA PRODUCT BORIVALI (WEST) REQUIRED 1/3 YEARS EXPERIENCE TALLY OPERATOR, HAVING KNOWLEDGE OF GST compliance, Finalisation of accounts, PREFREABLY DAHISAR TO KANDIVALI: **9930160151 / 9137849839**, sales@sdagroup.in {NC260391}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर, सर्व जाती थेट भेट कल्याण. **9869868620** {NC260009}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हर्नमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## जागाविषयक

रो-हाऊस प्लॉट १ गुंठा ६ लाख, ६० मीटर-३ लाख, विकणे आहे. MMRDA 3.0 री महामुंबई पासून ५ किलोमीटर अंतरावर, रोड टच, प्राईम लोकेशन लोढा ग्रुप / हिरानंदानी प्रोजेक्ट जवळ संपर्कः- **9920887465 / 8828987465** {NC260478}

# कर्जत नगराध्यक्ष रोहिणी घुलेंविरुद्ध १३ नगरसेवकांचा अविश्वास प्रस्ताव

■ कर्जत

**कर्जत** नगरपंचायतच्या नगराध्यक्ष रोहिणी सचिन घुले यांच्या विरोधात १३ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना लेखी पत्र देऊन अविश्वास प्रस्ताव दाखल करून त्यांना पदावरून दूर करावे, अशी मागणी केली आहे.

नगरपंचायतीत एकूण १७ नगरसेवक असून त्यापैकी १३ जणांनी नगराध्यक्षांविरोधात भूमिका घेतल्याने सत्ता समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या समर्थक नगरसेवकांनी एकत्र येत ही भूमिका घेतल्याची चर्चा रंगली आहे. अविश्वास प्रस्तावात नगराध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप

**राम शिंदे-रोहित पवार समर्थक एकत्र**

केले आहेत. मनमानी निर्णय, नगरसेवकांना विश्वासात न घेणे तसेच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवला आहे. आरोग्य, दिवाबत्ती, शिक्षण आणि सांडपाणी व्यवस्थापनासारख्या सेवांमध्ये अडचणी निर्माण झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# टीसीएस धर्मांतर, लैंगिक शोषण निदा खानला ४० दिवसांनंतर अटक

पान १ वरून

नगरसेवक मतीन माजिद पटेल याने निदाला आश्रय दिल्याचे कळले. त्यानंतर पोलिसांनी संशयित परिसरात गुप्त पाळत ठेवण्यासाठी विशेष पथके तैनात केली. आरोपीचे अचूक ठिकाण निश्चित झाल्यानंतर साध्या वेशातील पोलिसांनी नारेगाव परिसरात नियोजनबद्ध कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईत तिची आई-वडील आणि मावशीलाही ताब्यात घेतले. याप्रकरणात एकूण ९ आरोपींचा समावेश आहे. त्यापेकी शाहरुख कुरेश आणि रझा मेमन या दोघांना आज ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली तर नीदा खानला ११ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

याबाबत नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सांगितले की, नाशिक शहर देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्यानुसार या केसमध्ये आरोपी निदा खान हिचा जामीन न्यायालयाने फेटाळला होता. नाशिक शहर पोलीस आणि छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस यांच्या संयुक्त कारवाईने काल आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव या परिसरातून ताब्यात घेतले. तसेच नारेगाव परिसरातील स्थानिक नगरसेवक मतीन पटेल यांनी निदा खान हिला आश्रय दिल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे.

दरम्यान, सामाजिक कल्याण मंत्री आणि संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी एमआयएम नेते इम्तियाज जलील यांच्यावर निदा खानला मदत केल्याचा आरोप केला. मात्र जलील यांनी शिरसाट यांचे आरोप फेटाळून लावले.

जलील म्हणाले की, एफआयआरमध्ये निदाविरुद्ध विशेष गंभीर स्वरूपाचा उल्लेख नाही. एखाद्या व्यक्तीवर आरोप झाले म्हणजे तो दोषी ठरत नाही. न्यायालयात आरोप सिद्ध होईपर्यंत प्रत्येक व्यक्ती निर्दोष असते. याशिवाय निदा खानविरोधात अजामीनपात्र वॉरंट किंवा लुकआऊट नोटीस जारी झालेली नाही. त्यामुळे माध्यमांनी एखाद्याला गुन्हेगार ठरवू नये. न्यायप्रणालीवर माझा विश्वास आहे. नाशिक पोलीस नियमाप्रमाणे कारवाई करतील. पोलिसांना तपासासाठी वेळ दिला गेला पाहिजे. पोलीस मला जे प्रश्न विचारायचे ते विचारतील. पोलीस जिल्ह्याचे पालकमंत्री (संजय शिरसाट) यांच्या माध्यमातून मला प्रश्न विचारणार आहेत का? पालकमंत्री स्वतः पोलीस आहेत का? पालकमंत्री राजकारण करत असतील तर माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

# आजचे राशी भविष्य

शनिवार ता. ९ मे २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | उत्साही दिवस. महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यास अनुकूलता राहील. नवीन मित्र जोडले जातील. |
| वृषभ | यशप्राप्तीसाठी प्रयत्न वाढवावे लागतील. नातेसंबंध दृढ करण्याला प्राधान्य द्या. सर्वत्र वाहवा होईल. |
| मिथुन | दिवस फारसा अनुकूल नाही. ताण दूर ठेवा. सावधपणा हिताचा राहील. |
| कर्क | कामात व्यस्त राहाल. कठीण कामेही चुटकीसरशी पार पडतील. निर्णय योग्य ठरतील. |
| सिंह | कार्यपूर्तीस अनुकूल दिवस. यश सहजगत्या लाभेल. कामाची प्रशंसा होईल. |
| कन्या | तणावपूर्ण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. मात्र वातावरण आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करा. महत्त्वाचे आर्थिक निर्णय आज नकोत. |
| तूळ | महत्त्वाचे निर्णय आज नकोत. बोलण्यातून गैरसमज संभवतो. कामाचा ताण राहील. |
| वृश्चिक | प्रगतीसाठी अनुकूल लाभेल. कामाचा उत्साह राहील. महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूल दिवस. |
| धनु | नियोजनपूर्वक कामे करणे योग्य ठरेल. नशिबावर विसंबून राहू नका. कौटुंबिक प्रश्न त्रस्त करतील. |
| मकर | अपरिचितांबरोबर बोलताना सावध राहा. शब्द जपून वापरा. पूजाप्रार्थना मानसिक शांती देईल. |
| कुंभ | कामात अडथळे येतील. जोडीदाराबरोबर अहंपणा टाळा. वडिलांच्या तब्येतीकडे लक्ष द्या. |
| मीन | स्वप्रयत्नाने यश मिळेल. कामाच्या नवीन संधी मिळतील. जोडीदाराबरोबरचे नाते दृढ होईल. |

महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र दिन भव्यतम सोडत

तिकीट किं. रु. 200/- • सोडत क्रमांक 06 • सोडत दिनांक 08/05/2026

| मालिका | MD-01 | MD-02 | MD-03 | MD-04 | MD-05 | MD-06 | MD-07 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामायिक हमीपात्र बक्षीस 27 लाख | — | — | — | प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स - कल्याण, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत | | | 5273 |
| प्रोत्साहनपर बक्षिस 9000/- | 5273 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 5273 श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे | 5273 प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स - कल्याण | 5273 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 5273 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 5273 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | — |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षीस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 10,000/- | 2103 | 2320 | 5462 | 6343 | 6556 | 6750 | 9439 |
| तिसरे बक्षिस रु. 5,000/- | 0508 | 1217 | 1936 | 2750 | 6226 | 9380 | 9611 |
| चौथे बक्षिस रु. 2,000/- | 2444 | 3047 | 4156 | 4948 | 7444 | 8660 | 9792 |
| पाचवे बक्षिस रु. 1,000/- | 3575 | 5031 | 5523 | 6481 | 7987 | 8670 | 9523 |

सहावे बक्षीस रु. 500/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1032 | 1808 | 2521 | 3405 | 4118 | 4770 | 5615 | 6216 | 7008 | 7703 | 8381 | 9362 |
| | | 1041 | 1861 | 2533 | 3548 | 4130 | 4778 | 5640 | 6217 | 7040 | 7732 | 8404 | 9364 |
| | | 1044 | 1880 | 2541 | 3594 | 4143 | 4820 | 5669 | 6242 | 7096 | 7755 | 8500 | 9430 |
| 0025 | 0492 | 1057 | 1921 | 2573 | 3609 | 4202 | 4822 | 5674 | 6260 | 7097 | 7773 | 8543 | 9473 |
| 0064 | 0510 | 1089 | 1948 | 2597 | 3613 | 4204 | 4835 | 5716 | 6326 | 7121 | 7774 | 8552 | 9482 |
| 0077 | 0511 | 1095 | 1990 | 2615 | 3615 | 4215 | 4904 | 5719 | 6334 | 7151 | 7786 | 8594 | 9511 |
| 0097 | 0531 | 1100 | 1995 | 2643 | 3619 | 4263 | 4972 | 5739 | 6346 | 7164 | 7801 | 8607 | 9514 |
| 0112 | 0556 | 1102 | 2005 | 2694 | 3675 | 4276 | 5003 | 5763 | 6457 | 7171 | 7809 | 8631 | 9525 |
| 0119 | 0573 | 1120 | 2014 | 2733 | 3678 | 4377 | 5030 | 5843 | 6516 | 7172 | 7828 | 8636 | 9529 |
| 0181 | 0585 | 1132 | 2017 | 2799 | 3685 | 4409 | 5075 | 5877 | 6542 | 7177 | 7830 | 8653 | 9557 |
| 0203 | 0617 | 1166 | 2037 | 2815 | 3740 | 4416 | 5089 | 5891 | 6606 | 7198 | 7900 | 8757 | 9566 |
| 0206 | 0628 | 1228 | 2076 | 2862 | 3787 | 4425 | 5095 | 5903 | 6628 | 7199 | 7947 | 8774 | 9592 |
| 0208 | 0713 | 1311 | 2092 | 2902 | 3805 | 4458 | 5132 | 5907 | 6693 | 7238 | 7970 | 8810 | 9602 |
| 0230 | 0743 | 1358 | 2149 | 2906 | 3809 | 4487 | 5193 | 5943 | 6729 | 7261 | 8048 | 8821 | 9606 |
| 0235 | 0753 | 1377 | 2168 | 2909 | 3827 | 4514 | 5210 | 5958 | 6732 | 7270 | 8111 | 8838 | 9627 |
| 0241 | 0771 | 1436 | 2207 | 3023 | 3834 | 4517 | 5249 | 6007 | 6735 | 7304 | 8120 | 8840 | 9628 |
| 0258 | 0774 | 1508 | 2227 | 3038 | 3843 | 4534 | 5262 | 6030 | 6743 | 7330 | 8133 | 8900 | 9713 |
| 0295 | 0796 | 1514 | 2231 | 3046 | 3860 | 4538 | 5315 | 6052 | 6751 | 7372 | 8151 | 8903 | 9733 |
| 0315 | 0854 | 1520 | 2234 | 3081 | 3861 | 4566 | 5403 | 6053 | 6757 | 7429 | 8177 | 8959 | 9751 |
| 0341 | 0859 | 1535 | 2243 | 3102 | 3883 | 4585 | 5411 | 6057 | 6764 | 7448 | 8186 | 9027 | 9754 |
| 0352 | 0860 | 1567 | 2262 | 3117 | 3890 | 4589 | 5435 | 6060 | 6772 | 7577 | 8202 | 9059 | 9764 |
| 0382 | 0870 | 1582 | 2272 | 3134 | 3897 | 4591 | 5497 | 6072 | 6773 | 7579 | 8204 | 9078 | 9799 |
| 0398 | 0903 | 1600 | 2277 | 3185 | 3930 | 4592 | 5509 | 6077 | 6774 | 7638 | 8208 | 9112 | 9815 |
| 0411 | 0916 | 1626 | 2284 | 3189 | 3953 | 4606 | 5513 | 6114 | 6816 | 7651 | 8215 | 9187 | 9842 |
| 0422 | 0958 | 1639 | 2339 | 3212 | 3968 | 4635 | 5520 | 6139 | 6834 | 7667 | 8259 | 9216 | 9917 |
| 0430 | 0959 | 1671 | 2373 | 3242 | 3969 | 4646 | 5522 | 6185 | 6849 | 7684 | 8265 | 9253 | 9941 |
| 0436 | 0972 | 1715 | 2385 | 3303 | 3982 | 4662 | 5558 | 6190 | 6892 | 7692 | 8299 | 9284 | 9944 |
| 0458 | 0983 | 1716 | 2390 | 3318 | 4060 | 4676 | 5596 | 6196 | 6942 | 7694 | 8305 | 9288 | 9947 |
| 0474 | 0996 | 1776 | 2509 | 3351 | 4098 | 4731 | 5611 | 6212 | 7000 | 7700 | 8349 | 9353 | 9963 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता. ९/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ३ | ८ |
| ७३ | ३२ | ८२ |
| ७८ | ३८ | ८७ |
| १२४ | १३९ | १३४ |
| ३६८ | ४९० | ५६७ |

# लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

• राजलक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 08/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **SR-00 : 1610**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0269 | 0514 | 3098 | 5212 | 5890 | 5943 | 6135 | 6397 | 6626 | 7299 महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0353 | 0679 | 1175 | 1676 | 3228 | 3797 | 6158 | 7385 | 7983 | 8766 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0917 | 2229 | 2468 | 2549 | 4027 | 4416 | 5441 | 8147 | 8457 | 9890 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0865 | 2042 | 3277 | 4454 | 5005 | 6196 | 7838 | 8856 |
| | 1113 | 2208 | 3294 | 4465 | 5181 | 6280 | 7936 | 8924 |
| 0003 | 1118 | 2297 | 3306 | 4491 | 5417 | 6362 | 7958 | 8961 |
| 0013 | 1169 | 2352 | 3384 | 4510 | 5429 | 6510 | 8035 | 9196 |
| 0112 | 1179 | 2682 | 3385 | 4543 | 5498 | 6562 | 8088 | 9340 |
| 0120 | 1310 | 2727 | 3386 | 4550 | 5552 | 6566 | 8094 | 9392 |
| 0155 | 1367 | 2757 | 3419 | 4580 | 5557 | 6879 | 8099 | 9415 |
| 0344 | 1470 | 2892 | 3526 | 4642 | 5705 | 7007 | 8281 | 9416 |
| 0383 | 1511 | 3003 | 3568 | 4672 | 5754 | 7402 | 8348 | 9541 |
| 0398 | 1589 | 3183 | 3910 | 4695 | 5854 | 7619 | 8406 | 9592 |
| 0516 | 1820 | 3230 | 4119 | 4703 | 5925 | 7717 | 8416 | 9691 |
| 0560 | 1917 | 3244 | 4159 | 4818 | 5946 | 7758 | 8687 | 9924 |
| 0632 | 1987 | 3265 | 4274 | 4884 | 5951 | 7787 | 8827 | 9958 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

निकाल — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 08/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MG-02 : 9055**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- 3194

तिसरे बक्षिस रु. 2000/- 5638

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0129 | 1096 | 1296 | 1447 | 4572 | 4666 | 7308 | 8727 | 8868 | 9245 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0586 | 3719 | 4674 | 4974 | 5447 | 6726 | 7509 | 7667 | 7802 | 7868 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0464 | 1210 | 3286 | 6078 | 6971 | 8558 | 8830 | 9306 | 9313 | 9860 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1718 | 2763 | 3414 | 4441 | 5380 | 6031 | 6770 | 7971 | 9075 |
| | | 1739 | 2796 | 3503 | 4445 | 5439 | 6046 | 6838 | 7991 | 9092 |
| | | 1751 | 2816 | 3512 | 4451 | 5485 | 6088 | 6862 | 8001 | 9094 |
| 0019 | 0629 | 1781 | 2838 | 3616 | 4493 | 5502 | 6091 | 6898 | 8004 | 9108 |
| 0037 | 0701 | 1860 | 2922 | 3637 | 4500 | 5547 | 6188 | 7035 | 8063 | 9179 |
| 0042 | 0703 | 1888 | 2952 | 3638 | 4554 | 5566 | 6340 | 7051 | 8086 | 9193 |
| 0086 | 0774 | 1950 | 2968 | 3719 | 4559 | 5667 | 6448 | 7053 | 8240 | 9204 |
| 0097 | 0793 | 2071 | 2981 | 3742 | 4735 | 5697 | 6461 | 7137 | 8366 | 9269 |
| 0109 | 0895 | 2214 | 3013 | 3758 | 4770 | 5715 | 6465 | 7441 | 8390 | 9398 |
| 0113 | 0974 | 2254 | 3037 | 3843 | 4777 | 5735 | 6472 | 7456 | 8405 | 9437 |
| 0264 | 1076 | 2396 | 3038 | 3853 | 4847 | 5743 | 6525 | 7471 | 8412 | 9612 |
| 0270 | 1116 | 2402 | 3094 | 3903 | 4863 | 5769 | 6546 | 7528 | 8422 | 9615 |
| 0285 | 1123 | 2412 | 3133 | 4014 | 4888 | 5793 | 6550 | 7536 | 8456 | 9659 |
| 0300 | 1151 | 2422 | 3135 | 4094 | 4944 | 5828 | 6566 | 7597 | 8650 | 9729 |
| 0378 | 1191 | 2426 | 3274 | 4102 | 4989 | 5852 | 6628 | 7608 | 8662 | 9863 |
| 0393 | 1211 | 2482 | 3303 | 4141 | 5029 | 5899 | 6656 | 7637 | 8684 | 9876 |
| 0458 | 1220 | 2509 | 3324 | 4308 | 5075 | 5901 | 6665 | 7664 | 8741 | 9896 |
| 0517 | 1368 | 2540 | 3332 | 4318 | 5164 | 5950 | 6680 | 7781 | 8774 | 9899 |
| 0582 | 1481 | 2652 | 3342 | 4400 | 5214 | 5972 | 6682 | 7797 | 8841 | 9929 |
| 0585 | 1518 | 2725 | 3362 | 4403 | 5238 | 5988 | 6693 | 7893 | 8915 | 9941 |
| 0607 | 1655 | 2729 | 3405 | 4413 | 5358 | 5997 | 6720 | 7913 | 8983 | 9961 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# बघा आणि शांत बसा! अमित ठाकरेंचा एक्सवर व्हिडिओ पोस्ट करून संताप

■ मुंबई

**राज्यातील** वाढते गुन्हे, महिलांवरील अत्याचार, पर्यावरणाचे प्रश्न, कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्यावरून मनसे नेते अमित ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला. महाराष्ट्रात घडलेल्या विविध घटनांच्या व्हिडिओ क्लिप्स एकत्र करत त्यांनी एक्सवर बघा आणि शांत बसा अशा कॅप्शनसह व्हिडिओ पोस्ट केला. या व्हिडिओमध्ये अल्पवयीन मुली आणि महिलांवरील अत्याचार, नाशिक आणि पुण्यातील वृक्षतोड, मेट्रोचा गर्डर कोसळल्याच्या घटना, राजकीय वादातून होणाऱ्या हत्या, राज्यातील वाढते ड्रग रॅकेट, श्रीमंत अल्पवयीन मुलांकडून होणारे बेदरकार अपघात तसेच मुंबई परिसरातील कांदळवन स्थलांतराचा मुद्दा दाखवण्यात आला आहे. या सर्व घटनांदरम्यान नागरिकांनी काढलेल्या मोर्चांचे दृश्य आणि त्यावेळी अमित ठाकरे यांनी दिलेल्या प्रतिक्रिया देखील व्हिडिओमध्ये समाविष्ट केल्या आहेत.

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 08/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-01 : 7280**


सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षीस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1140 श्री अहिल्यादेवी लॉटरी - औरंगाबाद | 3456 | 3853 | 5018 | 6370 | 6846 | 7251 | 8130 | 8452 | 8582 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0148 | 0498 | 1799 | 3044 | 4131 | 4646 | 5945 | 8208 | 8290 | 8489 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0723 | 1046 | 1733 | 2308 | 4579 | 6707 | 6831 | 7696 | 9364 | 9992 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1941 | 2826 | 4181 | 4950 | 5023 | 5896 | 6489 | 6586 | 6718 | 9323 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1288 | 2274 | 3208 | 3985 | 4549 | 5595 | 6390 | 7370 | 8191 | 9094 |
| | | 1292 | 2277 | 3231 | 3998 | 4599 | 5646 | 6395 | 7381 | 8216 | 9207 |
| 0017 | 0776 | 1369 | 2282 | 3235 | 4016 | 4676 | 5654 | 6406 | 7403 | 8252 | 9219 |
| 0026 | 0807 | 1375 | 2299 | 3293 | 4043 | 4684 | 5655 | 6503 | 7410 | 8258 | 9248 |
| 0076 | 0859 | 1386 | 2375 | 3296 | 4098 | 4801 | 5682 | 6603 | 7449 | 8276 | 9315 |
| 0117 | 0892 | 1441 | 2382 | 3308 | 4147 | 4819 | 5745 | 6647 | 7505 | 8286 | 9331 |
| 0207 | 0898 | 1459 | 2392 | 3340 | 4204 | 4943 | 5875 | 6656 | 7583 | 8308 | 9428 |
| 0208 | 0953 | 1631 | 2424 | 3345 | 4233 | 4957 | 5958 | 6664 | 7629 | 8309 | 9464 |
| 0260 | 0970 | 1757 | 2425 | 3348 | 4240 | 5061 | 6013 | 6678 | 7701 | 8344 | 9498 |
| 0265 | 0982 | 1761 | 2492 | 3371 | 4242 | 5167 | 6056 | 6786 | 7752 | 8347 | 9575 |
| 0278 | 1071 | 1791 | 2560 | 3376 | 4243 | 5183 | 6086 | 6836 | 7766 | 8389 | 9749 |
| 0313 | 1100 | 1851 | 2563 | 3383 | 4276 | 5343 | 6121 | 6967 | 7797 | 8412 | 9759 |
| 0330 | 1107 | 1907 | 2795 | 3453 | 4314 | 5405 | 6186 | 7007 | 7835 | 8431 | 9782 |
| 0404 | 1108 | 1985 | 2803 | 3493 | 4413 | 5433 | 6209 | 7073 | 7838 | 8667 | 9825 |
| 0409 | 1120 | 2020 | 2826 | 3535 | 4415 | 5459 | 6211 | 7074 | 7907 | 8706 | 9857 |
| 0436 | 1152 | 2030 | 2988 | 3546 | 4422 | 5496 | 6222 | 7099 | 7909 | 8718 | 9894 |
| 0507 | 1153 | 2034 | 3013 | 3639 | 4446 | 5508 | 6232 | 7109 | 7937 | 8780 | 9904 |
| 0564 | 1161 | 2203 | 3063 | 3733 | 4474 | 5519 | 6268 | 7211 | 7978 | 8785 | 9959 |
| 0600 | 1181 | 2221 | 3095 | 3841 | 4483 | 5555 | 6270 | 7221 | 8045 | 8836 | 9962 |
| 0700 | 1213 | 2250 | 3103 | 3903 | 4487 | 5558 | 6276 | 7273 | 8063 | 8860 | 9977 |
| 0749 | 1218 | 2258 | 3120 | 3913 | 4495 | 5572 | 6286 | 7291 | 8098 | 8874 | 9989 |
| 0760 | 1238 | 2261 | 3141 | 3934 | 4541 | 5594 | 6364 | 7339 | 8162 | 8885 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


भारत सरकार
महाराष्ट्र शासन
सोमनाथ
सोमलिङ्गं नरो दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाञ्छितं मृतः स्वर्गं समाश्रयेत्॥
सोमनाथ
वारसा ७५ वर्षांचा
सोमनाथ मंदिर हे भारताच्या अभेद्य संस्कृतीचे प्रतीक आहे. मागील हजारो वर्षांमध्ये अनेक विध्वंसक आक्रमणांचा सामना करूनही सोमनाथ आजही आपल्या अभिमानाचे आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून अढळपणे उभे आहे. ७५ वर्षांपूर्वी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दृढ संकल्पामुळे सोमनाथाच्या आधुनिक पुनरुत्थानाचा मार्ग प्रशस्त झाला. आज प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही पवित्र भूमी भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाची अभिमानाने घोषणा करत आहे.
या सुवर्णक्षणाचे साक्षीदार बना
मुख्य कार्यक्रम
▪ कलश यात्रा
▪ भजन संध्या
▪ ओंकार मंत्राचा जप
▪ सोमनाथ पुस्तिकेत मंत्र लेखन
▪ सोमनाथाशी संबंधित कथांचे कथन
श्री सोमनाथ मंदिर संकुल, प्रभास पाटण | ८ ते ११ मे २०२६
"सोमनाथ हे आशेचे गीत आहे, जे आपल्याला शिकवते की, निर्मितीची शक्ती ही विध्वंसाच्या शक्तीपेक्षा कितीतरी अधिक सामर्थ्यशाली असते"
– प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी (अध्यक्ष, श्री सोमनाथ ट्रस्ट)
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
सोमनाथच्या गौरवशाली १००० वर्षांचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी योगदान द्या.
येथे स्कॅन करा
क्रमांक:आरओसी-२०२६-२७/क्र-५/डी६९३

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# चटई क्षेत्रासाठीचे बकध्यान

**अनेक** वेळेला राज्य सरकार किंवा केंद्र सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचे परिणाम हे तितकेच चित्रविचित्र स्वरूपाचे असतात. निर्णयांचा उद्देश किंवा उद्दिष्ट जरी चांगले असले तरी सुद्धा त्याचे परिणाम हे सकारात्मक असतील असे सांगता येत नाही किंवा एका विशिष्ट दृष्टिकोनातून निर्णय घेण्याचाही प्रकार पाहायला मिळतो. त्यातून नेमका कोणाचा कसा फायदा होईल हे सामान्य माणूस अंदाज लावू शकत नाही. व्यापक जनहितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे असे चित्र निर्माण केले जाते. किंबहुना तसेच होणे अपेक्षित असते. मात्र ज्यावेळेला त्या निर्णयांच्या अंमलबजावणीची वेळ येते त्यावेळेला त्याचे खरे स्वरूपही पाहायला मिळते. कारण घेतलेला निर्णय हा जनतेच्या हितासाठी असतो पण जनतेच्या नावाखाली एखाद्या विशिष्ट गटाचा फायदा करून देण्याचा छुपा उद्देशही असतो. आता सुद्धा राज्य सरकारने योग, ध्यान केंद्रांसाठी किंवा व्यायाम शाळेसाठी राज्यभरात मोफत दुप्पट चटई क्षेत्रफळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. विशेषतः गृहनिर्माण संस्थांमध्ये इमारतींचे किंवा गृह संकुलांचे बांधकाम करत असताना जर त्या विकासकाने किंवा गृहनिर्माण सोसायटीने आपल्या परिसरामध्ये योगासाठी आणि व्यायामासाठी स्वतंत्र सभागृहची तरतूद केली तर त्या सोसायट्यांना किंवा सोसायट्यांचा विकास करणाऱ्या विकासकांना दुप्पट चटईक्षेत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे पूर्वीपेक्षा जादा स्वरूपात हे चटईक्षेत्र निर्माण होईल त्यासाठी काही विशिष्ट अधिमूल्य द्यावे लागेल मात्र त्याच्या मोबदल्यामध्ये उपलब्ध होणारी जागा ही निश्चितच त्या विकासकाचा बऱ्यापैकी फायदा करून देणारी असेल. कारण जवळपास एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या ४% इतके चटई क्षेत्रफळ जर मोफत उपलब्ध होणार असेल तर कोणताही विकासक किंवा कोणतीही गृहनिर्माण संस्था तो लाभ पदरात पाडून घेण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही. किंबहुना ही एक मोठी संधी मानून आपल्या सोसायटीच्या परिसरामध्ये योग ,ध्यान केंद्राची निर्मिती करण्यासाठी तो निश्चितपणे उत्सुक राहील. प्रश्न निर्माण होतो की, सरकारला आता अचानकपणे एकदम योगाची किंवा ध्यान केंद्र, व्यायामशाळा उभारण्याची आवश्यकता का भासली आणि त्यासाठी थेट मोफत चार टक्के चटई क्षेत्रफळ उपलब्ध करून देण्याची उदारता कशी काय त्यांच्या मनामध्ये आली. यामागचा उद्देश निश्चितच उत्तम स्वरूपाचा आहे

### अन्यथा विकासकांचाच लाभ

आज समाजामध्ये चांगल्या पद्धतीचे स्वास्थ किंवा आरोग्य टिकवायचे असेल तर ध्यानधारणा व्यायाम यासारख्या गोष्टींना पर्याय नाही. कदाचित पुढच्या महिन्यात येणाऱ्या २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योगदिनापूर्वी राज्य सरकारने हा एक मोठा चांगला निर्णय घेतलेला दिसतो. या निर्णयातून त्या त्या परिसरातल्या किमान पाचशे लोकांना व्यायामासाठी पूरक वातावरण निर्माण होऊ शकते. प्रश्न एवढाच आहे की ज्या कारणासाठी हे वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक दिले जाणार आहे त्याचा नेमका त्याच कारणासाठी वापर होतो की नाही हे पाहण्याची सुद्धा जबाबदारी राज्य सरकारने किंवा महापालिकेने स्वीकारली पाहिजे. आज केवळ हा फायदा पदरात पाडून घेण्यासाठी त्या ठिकाणी किंवा संबंधित सोसायटीच्या विकास आराखड्यामध्ये ध्यान ,योग केंद्र किंवा व्यायामशाळांची तरतूद केली जाईल. त्याच्यासाठी साडेतीनशे फुटांची जागादेखील दाखवली जाईल. परंतु प्रत्यक्ष बांधकाम झाल्यानंतर म्हणजेच वर्ष दोन वर्षांमध्ये ज्यासाठी या जागा राखून ठेवल्या, त्याऐवजी वेगळ्याच कारणासाठी वापर सुरु होतो आणि त्यातून पैसा कमावण्याचे वेगळे तंत्र अवलंबले जाते. सरकारने हे मोफत चटई क्षेत्रफळ देत असताना त्याचा व्यापारी कारणासाठी वापर करता येणार नाही, अशी अट घातलेली आहे परंतु या अटीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्वीकारलेली दिसत नाही. त्याची वेळोवेळी तपासणी होणे आणि त्याच कारणांसाठी त्या जागेचा वापर होतो आहे की नाही याची खात्री करून घेण्याचे कर्तव्य महापालिकेला किंवा संबंधित यंत्रणांना पार पाडावे लागेल. यापूर्वीसुद्धा अनेक गृहनिर्माण सोसायटीमध्ये किंवा व्यापारी संकुलांमध्ये आयटी कंपन्यांसाठी वेगळा चटई निर्देशांक उपलब्ध करून दिला होता परंतु आज मुंबईमध्ये अनेक इमारतींमध्ये या चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर त्या कारणांसाठी झालाच नाही आणि प्रत्यक्षात यासाठी जागा राखून ठेवली होती तिथे मात्र हुक्का केंद्र किंवा क्लबहाऊस उभारले गेले. सरकारी यंत्रणांकडून त्यावर कोणतीही देखरेख ठेवली गेली नाही. परिणामी जादा चटईक्षेत्र फळाचा फायदा पदरात पाडून घेतला आणि त्याची विक्री करून करोड रुपये कमावले गेले. काही जणांनी ते भाड्याने दिले आणि त्यातून पैसा कमवला तसाच प्रकार या सोसायट्यांबाबत होऊ शकतो.

### दुसऱ्याच कारणांसाठी वापर

राखून ठेवलेली जागा त्याच कारणासाठी वापरली जाईल याची जबाबदारी त्या सोसायटीवर टाकली पाहिजे आणि जर तसा वापर झाला नाही तर त्याच्या विरोधात तितकाच जबरदस्त दंड आकारण्याची अंमलबजावणी केली तरच या सगळ्या उद्दिष्टाला योग्य ते फळ येईल. अन्यथा केवळ काही बिल्डरांनी आपल्या स्वतःच्या लाभासाठी ही योग आणि ध्यान केंद्राची वा व्यायामशाळेची शक्कल लढवली असावी. ज्यामधून ज्यादा चटई क्षेत्रफळ मिळवावे आणि आपले नफ्याचे प्रमाण वाढवावे त्या प्रमाणात चटईक्षेत्र मिळाल्यानंतर नक्कीच काही इमारतींवर एक-दोन मजले चढवता येतात आणि त्याची भरमसाठ किमतीने विक्री करता येते. असा दुहेरी फायदा विकासकाला किंवा अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना होऊ शकतो म्हणून या ध्यान योगा केंद्रासाठी योग्य ते ध्यान देण्याची आवश्यकता आहे.नाहीतर आपल्या स्वार्थासाठी वाळूत तोंड खूपसून बसलेल्या बगळ्याचे बकध्यान ठरेल. बिल्डरांना मिळणारे वाढीव चटई क्षेत्राचे ते योगासन त्यांचे आर्थिक स्वास्थ्य सुधारण्याचीच शक्यता वाटते.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

फुलांची किंमत सुगंधाने आणि माणसांची किंमत माणुसकीनेच सिद्ध होते. बाकी सुंदरता आणि पैसा फार दुरवर साथ देत नाही.

## पंचांग

**शनिवार, ९ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख कृष्ण सप्तमी
* नक्षत्र : श्रवण



रवी उदय- ०६-०८
रवी अस्त- १९-०२

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मकर

**कालाष्टमी; धनिष्ठा नवकारंभ; रात्री ११.२३ नंतर; संत नामदेव महाराज पुण्यतिथी-घोराड**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### लसणी मेथी



★ **साहित्य :** जुडी मेथी, ४ ते ५ लसूण पाकळ्या, १/८ टीस्पून जीरे, चवीनुसार मीठ घालावे, ग्रेव्हीसाठी, ७ ते ८ लसूण पाकळ्या, १ टी स्पून तीळ, १ टी स्पून शेंगदाणे, १ टी स्पून बेसन पीठ, १ टोमॅटो, २ कांदे, ३ लाल मिरची, १/८ टीस्पून जीरे, १ चिमूट हिंग, १/८ टीस्पून हळद, १ टी स्पून गरम मसाला, १ टी स्पून लाल तिखट, तेल, कोथिंबीर,

★ **कृती:** ३० मिनिटे
तीळ व शेंगदाणे भाजून घ्यावे शेंगदाणे साल काढून घ्यावे मग मिक्सरमध्ये शेंगदाणे,तीळ आणि बेसन पीठ हे सर्व बारीक करून घ्यावे. मग कांदे, टोमॅटो,कोथिंबीर, लसूण पाकळ्या,बारीक चिरून घ्यावे मग कढईमध्ये तेल गरम करून त्यात हिंग, जीरे, लसूण, लाल मिरची टाकून त्यात बारीक चिरलेला कांदा घालून परतून घ्यावे. कांदा परतून झाल्यावर त्यात टोमॅटो घालून थोडे वेळ परतून घ्यावे. मग त्यात शेंगदाणे, तीळ, बेसन पीठ हे घालावे. त्यात मसाले घालून परतून घ्यावे नंतर मेथी घालावी आणि चवीनुसार मीठ घालावे. थोडे पाणी घालून मंद आचेवर छान तेल सुटेपर्यंत शिजू द्यावे. आपली लसणी मेथी तयार आहे. एक प्लेट मध्ये काढून वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून गरम गरम सर्व्ह करावे.

## क्रीडा

# कोलकाताचा ८ विकेटने दणदणीत विजय

## प्लेऑफच्या शर्यतीतून दिल्लीचा संघ बाहेर



**दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ५१ व्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सला ८ विकेट आणि ३४ चेंडू शिल्लक राखून सहज मात दिली. या विजयासह कोलकाताने ९ गुणांसह आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जाण्याच्या आशा कायम ठेवल्या आहेत. या सामन्यात दिल्लीने निर्धारित षटकांत ८ बाद १४२ धावा केल्या. या प्रत्युत्तरात फिन ॲलनच्या नाबाद शतकी खेळीच्या बळावर कोलकाताने १४.२ षटकांत २ बाद १४७ धावा केल्यामुळे पराभवासह दिल्लीचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून कायमचा बाहेर पडला आहे.**

■ नवी दिल्ली

**कोलकाताने** नाणेफेक जिंकून दिल्लीला प्रथम फलंदाजी करण्याचे निमंत्रण दिले. दिल्लीकडून के.एल. राहुल आणि पथूम निसांका यांनी डावाची चांगली सुरुवात केली. मात्र राहुल स्थिरावल्यानंतर १४ चेंडूंत २३ धावा करून झेलबाद झाला. त्याच्या जागी आलेल्या नितीश राणाला ८ धावांवर कॅमेरॉन ग्रीनने तंबूत धाडले. त्यापाठोपाठ समीर रिझवी ३ धावा करून माघारी परतला. मात्र आक्रमक खेळी करणारा पाथुम निस्संकाही अर्धशतक करुन बाद झाला. अनुकूल रॉय ट्रिस्टन स्टब्सचा(२) त्रिफळा उडवला. परिणामी दिल्लीची अवस्था १०.५ षटकांत ५ बाद ८९ धावा अशी झाली होती. त्यानंतर दबावात अक्षर पटेल आणि आशुतोष शर्मा यांनी अतिशय धिमी खेळी केली. मग अक्षर पटेल २२ चेंडूंत ११ धावा करुन झेलबाद झाला. त्यानंतर आशुतोष शर्माने कोलकात्याच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. कार्तिक त्यागीच्या गोलंदाजीवर तो २८ चेंडूंत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ३९ धावा करुन बाद झाला. मिचेल स्टार्क खाते उघडण्यापूर्वी धावचित झाला. शेवटी विप्रज निगम नाबाद ३ आणि लुंगी न्गिडी नाबाद १ धावेवर केल्या. त्यामुळे दिल्लीने ८ बाद १४२ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना कोलकाताचे सलामीवीर अजिंक्य रहाणे आणि फिन ॲलन यांना चांगली सुरुवात करता आली नाही. संघाची धावसंख्या २.५ षटकांत २९ वर असताना अजिंक्य रहाणेला मिचेल स्टार्कने धावचित केले. अक्षर पटेलने अंगकृश रघुवंशीचा १ धावेवर त्रिफळा उडवला. फिन ॲलनने कॅमेरॉन ग्रीनच्या साथीत आक्रमक फलंदाजी केली. फिन ॲलनने ३९ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. या जोडीने संघाला १४.२ षटकांत विजयी आकडा गाठून दिला. ॲलनने ४७ चेंडूंत नाबाद १०० धावा आणि कॅमेरॉन ग्रीनने २७ चेंडूंत नाबाद ३३ धावा केल्या.

## एमसीसी पिंक संघाला विजेतेपद

**मुंबई-** एमसीसी पर्पल संघावर पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर मात करत एमसीसी पिंक संघाने ज्वाला स्पोर्ट्स फाऊंडेशन आयोजित एमसीसी प्रो फोर्टी १६ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट लीग प्लेट डिव्हिजनचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात एमसीसी पिंक संघाने पहिल्या डावात ९६ धावांची आघाडी घेत विजय नोंदवला. मोहम्मद, आदित्य घोषने विजयात मोलाची भूमिका बजावली.

## पाकिस्तानविरुद्ध कसोटीच्या पहिल्या दिवशी बांगलादेशच्या ४ बाद ३०१ धावा



■ मीरपूर

**मीरपूरमध्ये** सुरू असलेल्या दोन कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर बांगलादेशने ४ बाद ३०१ धावा केल्या. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. बांगलादेशचे सलामीवीर महमुदुल हसन आणि शादमन इस्लाम यांनी मोठी खेळी करण्यात अपयश आले. हसनला शाहीन शाह आफ्रिदीने ८ धावांवर तंबूत धाडले. हसन अलीने इस्लामला शिकार बनवले. इस्लामने १३ धावा करुन माघारी पाठवले. नजमुल आणि मोमिनुल हक यांनी संघाचा डाव सावरला. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १७० धावांची भागीदारी करुन संघाला सुस्थितीत आणली. नजमुल होसेन शतक पूर्ण करता बाद झाला. हकने मुश्फिकुर रहीमच्या साथीत संघाचा डाव पुढे नेला. मात्र संघाची धावसंख्या ३ बाद २७६ वर पोहोचताच हकला ९१ धावांवर नोमान अलीने पायचित केले. मुश्फिकुर ४८ धावांवर आणि लिटन दास ८ धावांवर नाबाद राहून तंबूत परतले.

## आयपीएलमधील खेळाडू आणि संघमालकांसाठी कठोर नियमावली

■ मुंबई

**आयपीएल** हंगामात शिस्तभंगाच्या काही गंभीर घटना समोर आल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आता सर्व १० फ्रँचायझींना कठोर नियमावली जारी केली आहे. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याच्या कथित वेपिंग प्रकरणानंतर बीसीसीआयने खेळाडू, सपोर्ट स्टाफ आणि संघ मालकांना तब्बल ८ पानांचे पत्र पाठत लक्ष्मण रेषा आखली आहे.
बीसीसीआयने सर्वात गंभीर इशारा हनी ट्रॅप संदर्भात दिला. काही खेळाडू हॉटेलमध्ये कोणतीही माहिती न देता पाहुण्यांना आपल्या रूममध्ये बोलावत असल्याचे आढळले. त्यामुळे बीसीसीआयने नवीन नियम लागू केले. टीम मॅनेजरच्या लेखी परवानगीशिवाय कोणालाही आता खेळाडूंच्या रुममध्ये प्रवेश मिळणार नाही. पाहुण्यांना भेटण्यासाठी फक्त हॉटेल लॉबी किंवा सार्वजनिक जागांचाच वापर करावा लागणार आहे. बीसीसीआयच्या मते हाय-प्रोफाईल स्पर्धांमध्ये खेळाडूंना जाळ्यात ओढण्याचे प्रकार वाढू शकतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने हे नियम आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. हॉटेलबाहेर जाण्यापूर्वी परवानगी बंधनकारक काही खेळाडू आणि कर्मचारी रात्री उशिरा सुरक्षा कर्मचाऱ्यांना माहिती न देता हॉटेलबाहेर जात असल्याचेही निदर्शनास आले. आता कोणालाही हॉटेल सोडण्यापूर्वी सिक्युरिटी लायझन ऑफिसर यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. खेळाडू, सपोर्ट स्टाफच्या प्रत्येक हालचालीची नोंद लॉग-बुकमध्ये केली जाणार आहे.

## एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब विजेतेपदाच्या उंबरठ्यावर

■ ठाणे

**महाराष्ट्र** माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित १४ व्या उपमुख्यमंत्री चषक ठाणे प्रीमियर लीगमध्ये विजयी आगेकूच कायम राखताना विजेतेपदाच्या उंबरठ्यावर स्थान मिळवले. स्पर्धेच्या उपांत्य फेरीत त्यांनी युनियन क्रिकेट अकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला. विजयासाठी युनियन क्रिकेट क्लबचे ७४ धावांचे आव्हान विजेत्यांनी ७ व्या षटकांत ७७ धावा करत विजय निश्चित केला. अटीतटीच्या अन्य लढतीत बॉईज क्रिकेट क्लबने एफटीएल एकादश संघाची १८७ धावसंख्या ५ फलंदाजांच्या मोबदल्यात १८८ धावा करत निर्णायक फेरीत प्रवेश केला. युनियन क्रिकेट अकॅडमीचे फलंदाज एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबच्या गोलंदाजासमोर पुरते हतबल झाल्याचे पाहायला मिळाले. आदित्य पवार आणि प्रतिक तरेने थोडाफार प्रतिकार केल्याने युनियन क्रिकेट अकॅडमीला ७४ धावापर्यंत मजल मारता आली. आदित्यने ३४ आणि प्रतीकने १४ धावा बनवल्या. शशिकांत कदमने ३, विवेक शेलार आणि सागर मिश्राने प्रत्येकी २ फलंदाज बाद करत फलंदाजांवर अंकुश ठेवला. विजयाचे माफक धावांचे आव्हान हार्दिक तामोरे, अखिल हेरवाडकर आणि रोहन राजेने छोट्या खेळी करत पार केले.

### जाहीर सूचना

येथे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खालील अनुसूचीत वर्णन केलेल्या मालमत्तेसंदर्भात मे.अस्मिता बिल्डर्स यांनी आमचे अशिल श्री. के. सायनुधीन व सौ. उम्मुकुलसु यांच्या पक्षात दिनांक ०५ जून २००४ रोजी केलेला मूळ विक्री करार सखोल शोध घेऊनही सध्या उपलब्ध होत नाही. सदर करार नोंदणी क्र. टीएनएन-२/५०५३/२००४ दिनांक २५ जून २००४ अन्वये नोंदणीकृत आहे.
सदर मूळ दस्तऐवज ज्यांच्या ताब्यात किंवा संरक्षेत असेल अशा सर्व व्यक्तींनी त्याबाबतची माहिती खाली नमूद केलेल्या पत्त्यावर स्वाक्षरीकर्त्यास कळवावी, तसेच सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर, मूळ शिर्षकपत्रांच्या ताबा किंवा संरक्षेच्या आधारे अथवा वारसा, करार, कंत्राट, विक्री, गहाण, ताबा, भेट, धारणाधिकार, भार, ट्रस्ट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दावा असल्यास, त्यासंबंधीची लेखी माहिती व पुराव्याची कागदपत्रे या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास सादर करावीत, अन्यथा, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे समजले जाईल आणि त्यानुसार शिर्षक प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

**अनुसूची**

फ्लॅट क्र. १०२, १ला मजला, अस्मिता गार्डन । कोहौसो लि., बी विंग, पूनम सागर कॉम्प्लेक्स, पेणकरपाडा, मीरा रोड पूर्व, ठाणे – ४०११०७ येथे स्थित, सर्वे क्र. २०४/२०६, गाव पेणकरपाडा क्र. ४, ठाणे नोंदणी जिल्ह्यात.
दिनांक: ९ मे २०२६
कु.दीपा शुक्ला
वकील, उच्च न्यायालय
६०१, राज आशिष कोहौसो लि., एम.जी. रोड, कला हनुमान मंदिरा जवळ, कांदिवली (प), मुंबई-४०००६७.

### जाहीर सूचना

माझे अशिल खरेदी करण्यास इच्छुक आहेत आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **फ्लॅट क्र. १००३, १० व्या मजल्या**वरील मोजमाप सुमारे ८५१ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्रफळ असलेला **(सदर फ्लॅट)** तसेच यासह **एव्हरेस्ट** म्हणून ज्ञात इमारतीच्या **लोअर स्टिल्टवरील एक कार पार्किंग जागा क्र.एलएस३९, जे. पी. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००६१.**, एस.क्र.५९, प्लॉट क्र.१, गाव वर्सोवा, तालुका अंधेरी, नोंदणी व उपनोंदणी जिल्हा मुंबई उपनगर जिल्हा येथील मालमत्तेच्या शिर्षकाची चौकशी करण्यात यावी.
सदर हक्क, फ्लॅट व वर नमूद शेअर्स संदर्भात कोणत्याही प्रकारचा आक्षेप असणारी कोणतीही व्यक्ती/पक्ष, न्यायिक किंवा अर्ध-न्यायिक प्राधिकरण, वित्तीय संस्था, बँक **तसेच सदर मालमत्ता/शिर्षकासंबंधी विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, वारसा, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार, वैयक्तिक/मैत्रीपूर्ण कर्ज किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा दावा** असलेल्यांनी, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **पंधरा दिवसांच्या** आत, त्यासंबंधीची कागदपत्रीय पुराव्यासह लेखी माहिती खाली नमूद पत्त्यावर स्वाक्षरीकर्त्यास कळवावी, अन्यथा, अशा प्रकारचा कोणताही दावा हा त्याग केलेला आणि/किंवा सोडून दिलेला समजला जाईल व त्यानंतर कोणतीही तक्रार/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही आणि ती शून्य व अवैध समजली जाईल.
**दिनांक: ०९.०५.२०२६** **सही/-**
**ठिकाण: मुंबई** **श्री. सुरेश आर. सावंत**
वकिल उच्च न्यायालय, मुंबई दुकान क्र.९, निशांत सोसायटी, अविनाश टॉवरसमोर, सेव्हन बंगलोज, अंधेरी (पश्चिम), मुंबई-५३.
संपर्क:-९३२४०२७८३५/९८२१५२०७१२
कार्यालय :-८०९७००२८९०
ईमेल :- adv.sureshsawant@gmail.com

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील मालक, श्री. नियाझ अहमद (उर्फ श्री. नियाझ अहमद, उर्फ श्री. नियाझ अहमद) यांच्याशी त्यांची खालील अनुसूचीमध्ये तपशिलवारपणे दिल्यानुसार स्थावर मालमत्ता म्हणजेच "दोशी दर्शन हेरिटेज" या इमारतीच्या बी-विंगच्या २ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०३ सदनिका ("सदनिका") व त्यासह संयुक्त उप-निबंधक, मुंबई यांच्याकडे अनु क्रमांक बीबीई२-२१३०२-२०२३ दिनांक १७.१०.२०२३ अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत केलेले नोंदणीकृत कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थान करारपत्र ("करारपत्र") दिनांक १७.१०.२०२३ मधील त्यांचे सर्व हक्क आणि लाभार्थी हितसंबंध खरेदी आणि संपादित करण्याकरिता बोलणी करीत आहेत.
कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदनिका, सदर करारपत्रामध्ये करारपत्र (मौखिक किंवा लेखी), हमी, व्यवस्था, विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, प्रभार, गहाणवट, भेट, न्यास, भाडेपट्टी, मासिक भाडेकरू, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भागिदारी, संयुक्त उपक्रम, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, ताबा, जुन्या वहिवाटीचा अधिकार, कोणताही प्रतिकूल अधिकार, शीर्षक, हितसंबंध, किंवा कोणत्याही स्वरुपाचा दावा, विवाद, खटला, हुकूम, आदेश, प्रतिबंधात्मक करार, मनाई हुकूम, जप्ती, संपादन, मागणी या मार्गे किंवा अन्यथा समाविष्ट असलेल्या कोणत्याही पद्धतीने कोणताही कायदेशीरदृष्ट्या सक्षम हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा दावा असल्यास त्यांनी त्याबाबत सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत वैध कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांच्या पत्त्यावर म्हणजेच खोली क्र. २९, २रा मजला, बॉम्बे म्युच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे एकतर योग्य लेखी पोचपावती घेऊन निम्नस्वाक्षरीकारांना हाती पोहोच करावे किंवा फक्त रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे पाठवावी, असे न केल्यास कोणताही दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर बोलणी पूर्ण झाल्यावर उपरोल्लेखित पक्षकारांच्या पर्यायानुसार व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००५ येथे स्थित कुलाबा विभाग, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. २११ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या/उभ्या "दोशी दर्शन हेरिटेज" या इमारतीच्या बी-विंगच्या २ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०३, मोजमाप अदमासे २२६ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह नोंदणीकृत कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थान करारपत्र दिनांक १७.१०.२०२३ मधील सर्व हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावे आणि लाभार्थी हितसंबंध. इमारत म्हणजेच मुंबई महानगरपालिकेद्वारे अनुक्रमांक एएक्स०२०२२३०२९००२४ अंतर्गत मूल्यांकित दोशी दर्शन हेरिटेज.
**श्री. प्रकाश डी. गोरिया**
दिनांक ८ मे, २०२६
वकील, उच्च न्यायालय मुंबई
खोली क्र. २९, दुसरा मजला, बॉम्बे म्युच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट,

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. संजय गणपत रिकामे हे गाव-खारी, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे स्थित जुना सर्व्हे क्र. १९६, नवीन सर्व्हे क्र. ७६, हिस्सा क्र. १०(भाग) धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या, भारत पॅलेस सीएचएस लि.च्या बी विंगच्या १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. ११०, मोजमाप ३२५ चौ.फू. चे मालक आहेत आणि त्यांनी मे. राजपूत कन्स्ट्रक्शन्स कं. आणि सरजीत जे. विश्वकर्मा यांच्या दरम्यानचे गहाळ मूळ करारपत्र दिनांक ११.०३.१९९६ करिता जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यासाठी मला सांगितले आहे.
कोणा व्यक्ती/क्तींना सदर मूळ करारपत्र सापडल्यास निम्नस्वाक्षरीकार यांना संपर्क साधण्याची आणि ते हस्तांतरित करण्याची विनंती करण्यात येते आणि उपरोल्लेखित बाबीची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे आणि याद्वारे खबरदार करण्यात येते की, उपरोल्लेखित दस्तऐवज किंवा मालमत्तेच्या आधारे कोणताही तृतिय पक्ष हक्क निर्माण करू नये किंवा कर्ज घेऊ नये किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. कोणी व्यक्ती/क्तींनी तसे करीत असल्यास त्याने/तिने स्वत:च्या खर्च आणि परिणामांच्या जोखमीवर करावे आणि अशी कृती/व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही.
तसेच, कोणा व्यक्ती/क्तींचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, करिता किंवा त्यावर विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, वारसा, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, हस्तांतरण, भाडेकरू, पोट-भाडेकरू, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, प्रलंबित कायदेशीर कारवाई, कर्ज, अग्रीम, धारणाधिकार, तारण, कोणत्याही न्यायालय, कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकारी यांच्याद्वारे मंजूर किंवा पारित आदेश, निवाडा किंवा हुकूम, जप्ती, तडजोड या मार्गे किंवा अन्यथा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांनी वैध कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना बी/१०६, १ ला मजला, सयीद मंझिल सीएचएस लि., पंडित दीनदयाल नगर, बसिन कॅथोलिक बँक लि. माणिकपूर समोर, वसई (प), जि. पालघर - ४०१२०२ येथे सदर सूचना प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, असे न केल्यास, कोणतेही दावे अस्तित्वात नाही आणि जर असल्यास, ते सोडून दिले किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.
वसई, दिनांक ९ मे, २०२६.
**सही/-**
**डेव्हीड एस. डाबरे**
**वकील उच्च न्यायालय, मुंबई**

# आरोग्य आणि महिला बाल कल्याण समिती बविआकडे

विरार

**वसई- विरार** महानगरपालिकेच्या आरोग्य समितीच्या सभापतीपदी निलेश देशमुख आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी बिना मायकल फुट्यार्डो यांची निवड झाली.

आज पालिकेच्या सभागृहात या दोन्ही समित्यांची निवडणूक पार पाडली. आरोग्य समिती सभापतीपदासाठी बविआचे निलेश देशमुख ९ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी भाजपाच्या डॉ.योगिता गवळी-करंजकर यांचा पराभव केला. योगिता यांना ६ मते मिळाली. उपसभापतीपदी बविआचे निषाद चोरघे यांनी ९ मते मिळवून भाजपाच्या जितेश हरिश्चंद्र राऊत यांचा पराभव केला. राऊत यांना ६ मते मिळाली. महिला आणि बालकल्याण समिती सभापती पदासाठी बहुजन विकास आघाडीच्या बिना फुट्यार्डो ९ मते मिळवून विजयी झाल्या.

# सात वर्षानंतर विरारमधील नारिंगी पूल वाहतुकीला खुला

**विरार** - शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा नारिंगी पूल शुक्रवारपासून खुला झाला. मागील ७ वर्षांपासून या पूलाचे काम रखडले होते. विरारमधील नारिंगी येथे रेल्वे फाटक आहे. तेथे मोठी वाहतूक कोंडी व्हायची. यासाठी ७ वर्षांपूर्वी नारिंगी रेल्वे उड्डाणपूलाचे काम हाती घेण्यात आले होते. जवळपास ७०० मीटर लांब असलेल्या या पूलासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च आला. मागील अनेक वर्षापासून विविध कारणांमुळे पूलाचे काम रखडले होते. अखेर आज पालकमंत्री गणेश नाईक आणि वसई-विरार महापालिकेचे महापौर अजीव पाटील यांच्या हस्ते या पूलाचे उद्‌घाटन करण्यात आले.

# मालमत्ता करात २० टक्के करवाढ

भाजपा आक्रमक

विरार

**वसई-विरार** महापालिकेने चालू आर्थिक वर्षात पाणीपुरवठा लाभकर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर लागू करून नागरिकांवर २० टक्क्यांहून अधिक करवाढ केली आहे. भाजपाने हा अन्यायकारक कर तातडीने रद्द करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला.

वसई विरार पालिकेने अर्थसंकल्पात सुचवलेली करवाढ स्थायी समितीपुढे ही करवाढ मागे घेण्यात आली होती. मात्र चालू वर्षाच्या करात 'पाणीपुरवठा लाभकर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर' लागू करण्यात आले आहे. शहरातील मलनिःसारण आणि भुयारी गटार योजनेची अवस्था अत्यंत बिकट आहे. सर्वांना पाणीपुरवठा होत नाही. वसईकर आधीच महागाईमुळे त्रस्त आहेत. अशावेळी २० चक्के करवाढ अन्यायकारक आहे, असे भाजपाने म्हटले.


## महावितरण — ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

म.रा.वि.वि.कं.मर्या., कोल्हापूर ग्रामीण विभाग -२, विभागा अंतर्गत खाली दिले प्रमाणे ई निविदा महावितरणच्या **http://works.mahadiscom.in/eTender/etender** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहेत. सदर निविदा भरणेचा कालावधी दिनांक १७.०५.२०२६ पर्यंत आहे. तरी संबंधितांनी नोंद घ्यावी.
संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक (७८७५७६९२०१) ई-निविदा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | ई-निविदा रक्कम (रु. लाखामध्ये) | निविदा क्र. | निविदा व जीएसटी (१८%) शुल्क रु. (फक्त ऑनलाईन पध्दतीद्वारे) | ईसारा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११ केव्ही एबी स्वीच दुरुस्ती करणे | १०.०० | EE/KPR-II/ AB Switch Repair/T-०६/२०२६-२७ | ११८०/- | १००००/- |
| २ | १२ SWG Tinned Copper Fuse Wire पुरवठा करणे | २.०० | EE/KPR-II/ १२ SWG F Wire//T-०७/२०२६-२७ | ५९०/- | २०००/- |
| ३ | १४ SWG Tinned Copper Fuse Wire पुरवठा करणे | २.०० | EE/KPR-II/ १४ SWG F Wire//T-०८/२०२६-२७ | ५९०/- | २०००/- |
| ४ | १६ SWG Tinned Copper Fuse Wire पुरवठा करणे | २.०० | EE/KPR-II/१६ SWG F Wire//T-०९/२०२६-२७ | ५९०/- | २०००/- |
| ५ | Alluminium Telescopic foldedable ladder पुरवठा करणे | १.०० | EE/KPR-II/AL Ladder /T-१०/२०२६-२७ | ५९०/- | १०००/- |

पीआरओ- KOPZ/४८/२०२६-२७ — कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग-२, कोल्हापूर



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मऔविम

### मुदतवाढ सूचना क्र.११

### ई निविदा सूचना क्र. ५२/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक सागर, ठाणे, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड्डे, मुंबई, दैनिक ॲक्टिव्ह टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई दैनिक भास्कर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचननेतील खालील कामांकरिता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा उपलब्धता, पुर्व अहर्ता बैठक व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई चा पुनर्विकास व मऔवि/ महामंडळाच्या ''रतन टाटा उद्योग भवन'' (मऔविम मुख्यालय) च्या इमारतीचे अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) करार पद्धतीने बांधकाम करणे. | ₹ ९०३.०८ |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १५/०७/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

पुर्व अहर्ता बैठक दिनांक ११/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मुख्य अभियंता (मुख्या.), मऔविम, उद्योग सारथी, महाकाली गुफा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई-९३ यांचे कार्यालयात अयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/ महामंडळाचा खुलासा दिनांक ३०/०६/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करून किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धीपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



## नवी मुंबई महानगरपालिका

### अतिक्रमण विभाग

### धोकादायक इमारती विषयी जाहिर आवाहन

पुण्यश्लोक ३००

उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने या नोटीसीव्दारे सोबत जोडलेल्या यादीतील इमारतीमध्ये वास्तव्य करणारे मालक / भोगवटादार किंवा इतर यांना असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि.०५.११.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार, आपण राहत असलेली इमारत निवासी / वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत तसेच या इमारतीमधील निवासी / वाणिज्य वापर तात्काळ थांबवावा व धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत आपणांस लेखी सूचना / नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सी-१ प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जल जोडणी खंडीत करण्यात येईल. तसेच वेळोवेळी वर्तमानपत्राव्दारे जाहिर आवाहन करण्यात आलेले आहे. आपण रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याचा संभव आहे. सदर इमारतीचा / बांधकामाचा निवासी / वाणिज्य वापर त्वरीत बंद करून सदरची इमारत / बांधकाम त्वरीत विनाविलंब तोडून टाकावे. अशी कार्यवाही न केल्यास इमारत / बांधकाम कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त आपणच जबाबदार राहाल. महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

### अतिधोकादायक सी - १ इमारती सन २०२६ - २७


| अ. क्र. | विभाग | वर्ष | अ. क्र. | धोकादायक इमारतींचे नाव | धोकादायक इमारतींची / सोसायटीची संख्या | धोकादायक इमारतींची संख्या | सी-१ अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या | रहिवास वापर सुरु आहे काय? होय/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | १ | निलगिरी कॉ. ऑप, से. २४/२५, इमारत क्र.इ-३ | | १ | सी-१ | नाही |
| २ | | २०१८-१९ | २ | निलगिरी कॉ. ऑप, बंगला क्र.७, से. २४ | | १ | सी-१ | नाही |
| ३ | | | ३ | निलगिरी कॉ. ऑप, बंगला क्र.८ से. २४ | ३ | १ | सी-१ | नाही |
| ४ | बेलापूर विभाग | २०१९-२० | १ | मे. श्री गणेश को. ऑप. हौ.सो.लि., मधील बिल्डींग नं. ए-१ ते ए-४, बी- १ ते बी - ८, सी- १ ते सी-४ व डी-१ ते डी-२, व (Commercial Building नं. 1 व 2 ), भु.क्र. १, सेक्टर-२८, नेरुळ, नवी मुंबई | १ | २० | सी-१ | होय |
| ५ | | २०२५-२६ | १ | नितीन स्मृती, भु. क्र. -बी- १४५, से-२९, अग्रोळी गाव, बेलापुर, नवी मुंबई- ४००६१४. | १ | १ | सी-१ | होय |
| ६ | | २०२६-२७ | १ | व्हाईट हाऊस को-ऑप हौ सोसायटी लि, प्लॉट क्र. २३३/२३४, सेक्टर-२१, नेरुळ (पुर्व), नवी मुंबई ४००७०६. | १ | १ | सी-१ | होय |
| ७ | | २०१९-२० | १ | पंचशिल अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, (बिल्डिंग नं. १ ते १७) १७ इमारती (एन.एल. २, टाईप, से.१ए, शिवाजी चौक, नेरूळ, नवी मुंबई) | १ | १७ | सी-१ | होय |
| ८ | | | १ | श्रीनाथजी सदन को. ऑप. हौ. सोसा. लि., भुखंड क्र. ५२, से. ०६, (G+3) नेरूळ नवी मुंबई - ४०० ७०६. | २ | १ | सी-१ | नाही |
| ९ | नेरुळ विभाग | २०२२-२३ | २ | सायलेंट व्हॅली अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, एन. एल. ५, बिल्डींग नं. २५ ते ३४, सेक्टर - ११, (G+2) नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६. | | १० | सी-१ | होय |
| १० | | | १ | कॉस्मोपॉलिटन सोसायटी - II, पुनित पार्क, प्लॉट नं. १८२ - सी, सेक्टर- १७, नेरूळ (प), नवी मुंबई. (G + ७ stories ) A, B, C & D Wing | २ | ४ | सी-१ | होय |
| ११ | | २०२३-२४ | २ | नंदनवन को. ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर- १७, प्लॉट नं.८४, (G+2) नेरूळ, नवी मुंबई - ४०० ७०६ | | १ | सी-१ | नाही |
| १२ | | २०२५-२६ | १ | शिवनेरी को. ऑप. हौ. सोसायटी लि. एन एल - ५, बिल्डींग नं. १, २ & ३, प्लॉट नं. १, सेक्टर- ३, नेरुळ, नवी मुंबई- ४००७०६. | १ | ३ | सी-१ | होय |
| १३ | | | २ | बादामी सदन, प्लॉट नं ०३, शिरवणे, सेक्टर-०१, नेरूळ, नवी मुंबई- ४००७०६. | १ | १ | सी-१ | नाही |
| १४ | | २०१७-१८ | १ | लिटिल फ्लॉवर को. ऑप. हौ.सो. लि जेएन-४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से. ९ वाशी | १ | १ | सी-१ | होय |
| १५ | वाशी विभाग | २०२१-२२ | १ | नुर को ऑप हौ सो लि, प्लॉट नं -१८, सेक्टर-०९ ऐ, वाशी, नवी मुंबई. | १ | ४ | सी-१ | होय |
| १६ | | | २ | सी १ व सी २ टाईप, बिल्डींग नं-१ ते १२, सेक्टर-०२, वाशी, नवी मुंबई. | | १२ | सी-१ | होय |
| १७ | | | ३ | सुमंगल अपार्टमेट, बी-३ (ii) टाईप ओनर्स असोसीएशन, भु. क्र. ६, सेक्टर- ३, वाशी, नवी मुंबई. | २ | १० | सी-१ | होय |
| १८ | | २०२२-२३ | १ | प्लॉट नं. ५८, सेक्टर- १२, वाशी, नवी मुंबई- ४००७०३, (G+3) | १ | १ | सी-१ | नाही |
| १९ | | २०२४-२५ | १ | अष्टविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बिल्डींग नं. २९ ते ३६, बी-३ टाईप, भुखंड क्र. ८३ए, सेक्टर - १५, वाशी नवी मुंबई- ४००७०३. | १ | ८ | सी-१ | होय |
| २० | | २०२५-२६ | १ | डी- टाईप अपार्टमेंट ओनर्स असोशिएशन, इमारत क्र. डी-१ ते डी - ४, सेक्टर- १, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. | १ | ४ | सी-१ | नाही |
| २१ | | २०१५-१६ | १ | मॅफको मार्केट, भु.क्रं. ७९६, से.१८, तुर्भे, नवी मुंबई | २ | १ | सी-१ | नाही |
| २२ | | | २ | कांदा बटाटा मार्केट, से- १८, तुर्भे, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| २३ | | | १ | ओमकार को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., से. २६, (ए-१ ते ए-२०), वाशी | | २० | सी-१ | होय |
| २४ | | | २ | महाराष्ट्र को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सी-८८ ते सी- १०५, इमारतीच्या वर, शिवनेरी नगर, सेक्टर - २६, वाशी- (बिल्डींग नं. ६५ ते ११५ ) | | ५० | सी-१ | होय |
| २५ | | | ३ | हॅपी होम को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., सेक्टर-२६, वाशी, (बिल्डींग नं. D / ११६ ते D/१३९) | | २३ | सी-१ | होय |
| २६ | तुर्भे विभाग | २०१६-१७ | ४ | प्रगती को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., ई-ब्लॉक, से. २६, वाशी, (बिल्डींग नं. E- १४० ते E - १६१) | ८ | २१ | सी-१ | होय |
| २७ | | | ५ | वसंत विहार सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादीत), कंडोनियम एफ, से. २६, वाशी (बिल्डींग नं. F - १६२ ते F-१८३) | | २१ | सी-१ | होय |
| २८ | | ८ | ६ | प्रितीसंगम को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., शिवनेरी नगर, से. २६, वाशी (बिल्डींग नं. G - १८४ ते G-२०५) | | २१ | सी-१ | होय |
| २९ | | | ७ | वैभव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., शिवनेरी नगर, से. २६, वाशी (बिल्डींग नं. H - २०६ ते H-२२५) | | १९ | सी-१ | होय |
| ३० | | | ८ | चिंतामणी को. ऑप. हौ. सोसायटी लि. (बी-२१ ते बी-६४), सेक्टर क्र. २६, वाशी, नवी मुंबई | | ४३ | सी-१ | होय |
| ३१ | | २०१९-२० | १ | अमोली को. ऑप. हौ.सो.लि. भु. क्र. २८, से. ३०, सानपाडा रेल्वे स्टेशन जवळ (उत्तर), नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| ३२ | | २०१९-२० | १ | विकास टप्पा- २, मार्केट -१ ( मसाला मार्केट) येथील मध्यवर्ती इमारत, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, से.१९, तुर्भे, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| ३३ | | २०२१-२२ | १ | इमारत क्र. F - १ ते F- ४, पार्क व्हिव सोसायटी भुखंड व कंडोनिअम क्र. ६, सेक्टर- ७, सानपाडा, नवी मुंबई. | १ | ४ | सी-१ | होय |
| ३४ | | २०२२-२३ | १ | श्री. विनायक सोसायटी, भु. क्र. १, से. ५, (G+३)सानपाडा, तुर्भे नवी मुंबई - ४००७०५. | १ | २ | सी-१ | होय |
| ३५ | | २०२३-२४ | १ | कस्तुरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भुखंड क्र. २, सेक्टर- ४, सानपाडा, नवी मुंबई. | १ | १ | सी-१ | होय |
| ३६ | | २०२५-२६ | १ | साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, इमारत नं. बी- ७ ते १२, भुखंड क्र. ११, सेक्टर-१०, सानपाडा, नवी मुंबई - ४००७०५ | १ | ६ | सी-१ | होय |
| ३७ | | २०१७-१८ | १ | गगनगिरी को. ऑप हौ. सोसायटी लि, कंडोनियम क्र. ०२, सी टाईप, इमारत क्र. १ ते १३, सेक्टर ९, कोपरखैरणे | २ | १३ | सी-१ | होय |
| ३८ | | | २ | मे. चंद्रलोक को. ऑप. हौ.सो.लि., भुखंड क्र. ७, कंडोनियम क्र.०७, सेक्टर १०, कोपरखैरणे | | ४७ | सी-१ | होय |
| ३९ | कोपरखैरणे विभाग | २०२१-२२ | १ | प्लाझा को. ऑप. हौसिंग सोसायटी, भुखंड क्र. ६९, से. २, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९. | २ | १ | सी-१ | नाही |
| ४० | | | १ | स्पोर्टस अरेना को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. भु. क्र. ६७, से.२, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९ | | १ | सी-१ | नाही |
| ४१ | | | १ | सिल्व्हर सॅन्ड, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, भु. क्र. बी-६२ ते बी-६५, (G+४) से. १९, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४०० ७०९. | | १ | सी-१ | नाही |
| ४२ | | २०२२-२३ | २ | त्रिदल एक्स-सर्व्हिसमेन, को. ऑप. हौसिंग सोसायटी, लि. भु. क्र. ६, सेक्टर- २०, (G+३) कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. | ३ | १ | सी-१ | नाही |
| ४३ | | | ३ | सिल्व्हर नेस्ट को. ऑप. हौ. सोसायटी लि., भु.क्र.८९, से.१५, (G+३), कोपरखैरणे नवी मुंबई- ४००७०९ | | १ | सी-१ | होय |
| ४४ | | | १ | सिटी शाईन को. ऑप. हौ. सोसा.लि. प्लॉट नं. १४. सेक्टर- २. कोपरखैरणे. नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| ४५ | | २०२५-२६ | २ | राज पॅलेस को. ऑप. हौ. सोसा. लि. प्लॉट नं. १६, सेक्टर- २, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४००७०९. | १ | ३ | सी-१ | होय |
| ४६ | | | ३ | श्री. श्याम को - ऑप हौ. सोसायटी, प्लॉट नं. ४१, सेक्टर-१, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९. | १ | १ | सी-१ | नाही |
| ४७ | घणसोली विभाग | २०१६-१७ | १ | श्री. दत्ता मधुकर पाटील भवानी मंदिराशेजारी, कालआळी, घणसोली नवी मुंबई | १ | १ | सी-१ | नाही |
| ४८ | | २०२४-२५ | १ | घणसोली, रबाळे, शाळा क्र. ५५, कातकरीपाडा समाजमंदिर, घणसोली नवी मुंबई. | १ | १ | सी-१ | नाही |
| ४९ | ऐरोली विभाग | २०१५-१६ | १ | श्री. प्रकाश नामदेव नाईक व इतर घर क्र. ५२, दिवागांव, ऐरोली. | | १ | सी-१ | नाही |
| ५० | | | २ | श्री. अशोक आर. शुक्ला, रो. हा. क्र. बी-०१ व बी - ०२, गणेशबाग, को. ऑप. हौ. सोसा., लि., प्लॉट नं. १, सेक्टर - ०१ | २ | १ | सी-१ | नाही |
| ५१ | | २०२५-२६ | १ | सहजीवन अपार्टमेंट, ओनर्स असोसिएशन, टाईप एएल-४, इमारत क्र. १ ते ११, सेक्टर- १६, सिडको कॉलनी, ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०८. | १ | ११ | सी-१ | होय |
| ५२ | दिघा विभाग | २०१६-१७ | १ | खंडू कोळी चाळ, दिघा पुर्व, (DIG - DIG - 0022), दिघा, नवी मुंबई | १ | १ | सी-१ | होय |
| | | | | | ५२ | ३७६ | ५२ | ० |

उपरोक्त धोकादायक इमारतींच्या वर्गीकरणानुसार इमारती भोगवटा वापर / रहिवास करणाऱ्यांनी इमारती तात्काळ निष्कासित करावयाच्या आहेत. किंवा वर्गीकरणानुसार इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या भोगवटा धारकांनी इमारती दुरूस्ती करून आवश्यक उपाय योजना करणे अगत्याचे आहे. अन्यथा धोकादायक परिस्थिती उदभवल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
( डॉ. कैलास शिंदे )
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र.नमुंमपा/जनसंपर्क/जाहिरात/३६३/२०२६
दिनांकः- ०८/०५/२०२६

# नवाकाळ शब्दकोडे–१६००



## आडवे शब्द –

१. जनावराला ताब्यात ठेवणारी दोरी ४. मनातले ओळखणारा ७. भस्मासूराला मारण्यासाठी विष्णूने घेतलेले स्त्री रूप १०. अलिप्त राहून पाहणारा १२. मेघ १३. भ्रष्ट पैसा १४. संकट १५. अशुभसूचक, वाईट सवय १६. कुटील बेत १७. पक्ष्यांचा राजा १९. नुकताच आलेला, अननुभवी, नवशिका २१. पोच, दाद २२. कार्यालय २४. चिक्कार २६. तलाव ३०. वाईट कृत्य ३२. बाधा ३३. त्वरित ३५. चरण ३६. रोगप्रतिबंधक औषध ३८. घरासमोरचे आवार ३९. कपाळ ४०. सामूहिक अटकसत्र ४३. सर्वजण ४४. मजबूत, पुष्ट ४५. मृग ४६. बाल्य ४८. तराजू ५१. रुदन ५२. दरवाजा ५३. ददात ५५. मीठ ५९. रेल्वे ६१. अर्धी ओंजळ ६२. दारू ६३. त्या बाजूला ६५. आण्विक हल्ल्याचा सामना केलेला देश ६७. दुधाचा आटवलेला गोळा ६८. दिवस ६९. वेगळेपण, फरक ७०. आपली मातृभाषा ७१. तजेला ७३. अवघ्यांनी मिळून धरावा असा सन्मार्ग ७४. वरचढ ७६. हल्ली ७८. प्रपात ८०. चार ओळींची कविता (पण चारोळी नव्हे) ८२. मिरवणुकीचा गुलाबी रंग ८४. कोकणातले काटेरी फळ ८६. झोपडी ८७. अखेरचे श्वास मोजत असलेला ८९. प्रवाह ९०. मांडी, खेळाचा मांडलेला डाव ९१. वधू ९३. हिरवे रत्न ९४. सावध ९५. केरळमधला नृत्यप्रकार ९७. प्रथम ९९. डळमळीत १००. डोक्यावर मारलेली थप्पड १०१. आर्जवे १०२. वर्तुळ

## उभे शब्द –

१. अडचणीतल्या माणसाच्या परिस्थितीचे वर्णन करणारी म्हण- 'अडला हरी ×××× ×× ××' ३. कॉफीचा पेला, नंतर ४. रगेल, माजोरडा ५. विद्या, कसब, कौशल्य ६. दिलेला शब्द, आश्वासन ७. फुकट ८. फायद्याची गोष्ट ९. तारुण्याचा बहर, नवी पालवी १०. लिहिता वाचता येणारा ११. कमजोर, अशक्त १४. चारचौघांहून निराळे, और १५. कठीण १६. कावळा १८. अंगरखा २०. वायू २३. पद्धत २५. टेकडी, डोंगराचा उतार २७. वडील २८. तबला वाजवणारा २९. बेळगाव या राज्यात आहे ३१. केसांचा कृत्रिम रंग ३४. छातीतले हाड ३७. सर्व ३८. 'नाचता येईना ××× ×××!' ४१. उन्हाचा त्रास ४२. कोवळी फांदी ४३. बेचव ४४. अस्वस्थता ४५. हाकून लावणे ४९. उत्साह ५०. धैर्य, संयम ५३. तक्तपोशी ५३अ. संरक्षक भिंत ५४. तराजू ५६. व्रत, नेम ५७. आयुर्वेदिक उपचार करणारा ५८. अधोगती झालेला ५९. आंब्याचे वन ६०. सागराच्या लाटांचा आवाज ६२. बेत, हेतू ६४. हात ६६. पती ६७. दुष्ट माणूस ६९. बिछाना ७०. गुंड ७२. आदर ७५. स्थानकात गाड्या थांबण्याची जागा ७७. ध्यान लावून बसलेला ७८. सुदृढ ७९. धीट, दांडगा ८१. गाठोडे ८२. कोणाला कळू न देता ८३. खोडकर ८४. सडेतोड बोलणारा ८५. लहान चाकू ८६. सुगरणीचे घरटे ८७. आस ८८. वास्तविक स्थिती, अवस्था ९०. रस्ता ९२. तोंड ९४. एजंट ९५. मनाचा ओढा, उपजत आवड ९६. दूध ९८. थंडी, हुडहुडी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. प्रहार ३. प्रशंसनीय ६. कुत्रं पीठ खातं ९. अभाव १०. आणि ११. शकल १४. वराह १६. पारावार १८. शीतल २०. सज्ज २१. निशा २२. शापित २४. रजनी २६. हर्ष २७. हजामत २८. मलीन ३१. नीरव ३३. कसर ३५. रोष ३६. चकमक ३८. शिंपी ३९. पितर ४१. किंवा ४३. वानर ४४. सावध ४५. दास ४७. कुंभकर्ण ४९. संगती ५०. वरद ५१. जहाज ५३. कुंभक ५४. राजी ५५. रोगी ५६. इक्षुदंड ५७अ. थापा ५९. साखरपुडा ६१. हेवा ६२. राजा ६३. डुलकी ६४. गचाळ ६५. सेतू ६६. कस ६७. राका ६८. कुडी ६९. सूचित ७२. पुतना ७३. रोज ७४. मामुली ७६. साद ७७. यातना ७८. सर्व ७९. तख्त ८०. बनचुके ८२. परिवार ८३. माकड ८५. शिसपेन्सिल ८७. रातवा ८९. बकासूर ९१. करडा ९३. घसा ९६. मघाशी ९७. कापा १०१. रस्सीखेच १०३. कढई १०४. कावराबावरा १०५. मल्लीनाथी १०६. रव

**उभे शब्द** : १. प्रभावशाली २. हावरा ३. प्रणिपात ४. सणवार ५. यश ६. कुल ७. पीडित ८. खाज १२. कष्ट १३. लज्जत १५. हशा १७. रजनीकर १८. शीर्षक १९. लहर २०. समजूतदार २१. निमग्न २३. पिठी २५. नीर २९. नरो वा कुंजरोवा ३०. थकवा ३२. वशिंड ३४. सत्यवती ३७. मनन ४०. रसद ४२. शिकस्त ४४. सागर ४६. गजरा ४८. लाभ ५०. वजीर ५२. भिक्षु ५३. कुंडल ५३अ. कथा ५४. राख ५६. इजा ५७. दंडुका ५८. पागडी ५९. साळसूद ६०. पुच्छ ६१. हेतूपूर्वक ६२. रास ६६. कनात ६७. राजरोस ६८. कुलीन ७०. तयारीचा ७१. अनारसा ७५. मुबलक ७६. साकेत ७७अ. तवा ७८. समान ८१. चुराडा ८४. डबघाई ८५. शिरकाव ८६. पेरू ८८. वाघ ९०. काशी ९२. रक्त ९४. सारथी ९५. अखेर ९६. मढ ९८. पारा ९९. शैव १००. हल्ली १०२. चव

## विजय तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री

पान १ वरून

सत्तास्थापनेसाठी एकत्र येतील अशी चर्चा सुरू झाली होती. या सर्व घडामोडी होत असताना भाकपा आणि माकपा नेत्यांची बैठक संपन्न झाली. या पक्षांकडे प्रत्येकी दोन दोन आमदार आहेत.त्यांनी टीव्हीकेला पाठिंबा जाहीर करताच विजय यांच्याकडे ११६ आमदार झाले. तरीही बहुमतासाठी दोन आमदारांची गरज होती. ती गरज व्हीसीकेने भागवली. तसेच अम्मा मक्कल मुनेत्र कळघम (एएमएमके) आणि इंडियन युनियन मुस्लीम लिग यांनीही पाठिंबा दिल्याने हे संख्याबळ बहुमतापेक्षा जास्त म्हणजे १२१ वर पोहोचले.

# दहावीचाही निकाल २ टक्के घटला

पान १ वरून

निकाल ९४.९६ टक्के लागला आहे. मुलींचा निकाल मुलांच्या तुलनेत ५.४० टक्क्यांनी अधिक आहे. विभागनिहाय निकालात कोकण विभाग ९७.६२ टक्क्यांसह राज्यात अव्वल ठरला आहे. तर छत्रपती संभाजीनगर विभाग ८८.४१ टक्क्यांसह सर्वात तळाला राहिला आहे. पुणे, मुंबई, कोल्हापूर या विभागांनीही ९४ टक्क्यांपेक्षा जास्त निकाल नोंदवला आहे. यंदाच्या निकालाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील तब्बल १७९ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. यामध्ये सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातील आहेत. तर छत्रपती संभाजीनगर विभागात २४ विद्यार्थ्यांनी शंभर टक्क्यांची कमाई केली आहे.

राज्यातील ६,६१२ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. ४ लाख २२ हजारांहून अधिक विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ९,९१२ दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी ९,०४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचा निकाल ९१.२२ टक्के इतका लागला आहे. गुण पडताळणीसाठी विद्यार्थ्यांना ९ मे ते २३ मेदरम्यान ऑनलाइन अर्ज करता येईल. यंदा प्रथमच गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र एकत्र दिले जाणार आहेत. निकालानंतर १५ दिवसांत गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र शाळांमध्ये उपलब्ध होतील. निकालानंतर विद्यार्थ्यांवरील तणाव लक्षात घेऊन 'टेलिमानस' (१४४१६) आणि 'मनोदर्शन' (८४४८४४०६३२) या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाकडून करण्यात आले आहे.

### निकालाआधीच विद्यार्थ्याची आत्महत्या

दहावीच्या निकालाची उत्सुकता असतानाच छत्रपती संभाजीनगरमधील पुंडलिक नगर परिसरातील १७ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. गेल्या काही दिवसांपासून हा विद्यार्थी निकालाबाबत प्रचंड तणावाखाली होता. परीक्षेत आपण उत्तीर्ण होणार नाही, या भीतीने तो मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होता. आज सकाळी घरात कोणीही नसताना त्याने गळफास घेऊन आपले जीवन संपवले. निकाल जाहीर होण्याच्या काही तास आधीच त्याने टोकाचे पाऊल उचलले.

**महावितरण** – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

मान्यताप्राप्त व महावितरणच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन सातारा मंडलांतर्गत विभागीय कार्यालय, सातारा, कराड,वाई व वडुज या विभागामध्ये बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार पुरविणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत (सातारा विभाग-निविदा क्र.१६/२०२६-२७, रक्कम रु. ७९२.७९ लक्ष), (कराड विभाग - निविदा क्र. १७/ २०२६-२७, रक्कम रु.७९२.४४ लक्ष), (वाई विभाग - निविदा क्र. १८/२०२६-२७, रक्कम रु.५६६.४९ लक्ष), (वडुज विभाग- निविदा क्र. १९/२०२६-२७, रक्कम रु.५२७.२२ लक्ष) (जीएसटी वगळता) सदर निविदा ई-टेंडरिंग पद्धतीनेच भरता येतील. त्याकरीता निविदा भरु इच्छिणाऱ्या पुरवठादारांचे महावितरणकडे ई-टेंडरिंग नोंदणी असणे आवश्यक आहे. निविदेबाबतचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. अधिक माहिती व निविदा प्रत www.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. १८/०५/२०२६ रात्री १२.०० पर्यंत उपलब्ध राहील.

**मुख्य कार्यालय,मुंबई पी.आर.ओ. क्र.११२/२६**

**अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडल कार्यालय, सातारा**

# टाटा ट्रस्टची महत्त्वाची बैठक लांबणीवर

पान १ वरून

सन्सला अप्पर-लेयर एनबीएफसी म्हणून वर्गीकृत करून तीन वर्षांत सार्वजनिक होण्याचे निर्देश दिले होते. यापूर्वी समूहाने कर्ज पुनर्रचना करून हे लिस्टिंग टाळण्याचा प्रयत्न केला होता. आता रिझर्व्ह बँकेने ते मार्ग बंद केले आहेत. नोएल टाटा यांना भीती आहे की लिस्टिंगमुळे ग्रुप कंपन्यांवरील टाटा ट्रस्ट्सचे नियंत्रण कमी होऊ शकते. दरम्यान, माजी विश्वस्त मेहली मिस्त्री यांनी वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांच्या 'टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्ट' मधील फेरनियुक्तीलाच तीव्र विरोध दर्शवत त्यांच्या विरोधात मतदान केले आहे. श्रीनिवासन आणि सिंग यांचा सध्याचा कार्यकाळ लवकरच संपणार आहे. ट्रस्टच्या नियमांनुसार, कोणत्याही विश्वस्ताचा कार्यकाळ वाढवण्यासाठी 'सर्वानुमते संमती' अनिवार्य असते. मेहली मिस्त्रींसह दोन विश्वस्तांनी विरोधात मतदान केल्यामुळे वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांचे पुन्हा विश्वस्त होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. यावर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

# सुवेंदुंवर धाड पडली! भाजपात प्रवेश

पान १ वरून

जवळून पाहिले आहे. त्यांचे काम पाहिले आहे. त्यांनी जो संघर्ष केला आहे तो पाहिला आहे. त्यांच्या संघर्षामुळेच बंगालमध्ये आज भाजपाची सत्ता आली आहे. बंगालच्या जनतेच्या आशा आकांक्षा नक्की पूर्ण करतील.

अमित शहा पुढे म्हणाले की, २०१४ मध्ये सुरू झालेला हा प्रवास खरोखरच अभूतपूर्व आहे. २०१४ ते २०२६ या काळातील भाजपचा प्रवास हे, केवळ कठोर परिश्रम आणि रणनीतिक कौशल्याच्या जोरावर जनतेचा जनादेश कसा मिळवता येतो आणि त्याचे संवर्धन कसे करता येते, याचे जगातील सर्वोत्तम उदाहरण ठरले आहे. आम्ही जनतेला वचन देत आहे की, आम्ही प्रत्येक घुसखोराला केवळ बंगालमधूनच नव्हे, तर संपूर्ण देशातूनसमूळ नष्ट करू. हा ध्रुवीकरणाचा मुद्दा नाही. हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा आहे.

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**

Municipal Bank Bhavan, 245, P. D'mello Road, Fort, Mumbai –400001.
Tel. 91-22-2261 3814/91-22-22717800/858/852
Email : mcb.itcell@mcbmumbai.com

**Sealed Tenders are invited for Authorized dealer for purchasing Microsoft office 365 Business Standard for The Municipal Co-op Bank Ltd, Mumbai**

The Municipal Co-Operative Bank Ltd, Mumbai invites request for proposal for **"Authorized dealer for purchasing Microsoft office 365 Business Standard for The Municipal Co-op Bank Ltd, Mumbai"**

Tender to be downloaded from the Bank's following Website: **www.mcb.bank.in**

Eligible vendor shall be selected based on the RFP response received by the bank.

Tender to be submitted to the Bank on or before 18th May 2026 upto 5.00PM.

**Place: Mumbai** **-sd/-**
**Date:09/05/2026** **General Manager**

**जाहीर निवेदन**

**नाव: संजय श्रीराम यादव**
**पत्ता:** S/O श्रीराम यादव जी. ५० बी.एन डीसौजा कंपाऊंड जगलेश्वर मंदिर मार्ग खौरानी रोड साकीनाका, मुंबई (महाराष्ट्र)
PIN NO:- ४०००७२

मी, संजय श्रीराम यादव, मृत परवाना धारक श्री. श्रीराम सुंदर यादव यांचा मुलगा आहे. माझे वडील, **श्री. श्रीराम सुंदर यादव** यांचे दिनांक १६/०१/२०२५ रोजी दुर्दैवाने निधन झाले असून त्यांचे नावे असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३२-ई-१५९ (कुर्ला) चे प्राधिकार पत्र मी कायदेशीर वारस ठरत असल्यामुळे वारस म्हणून माझे नावे होण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई यांचेकडे अर्ज सादर केला आहे. या संदर्भात कोणाला काही आक्षेप असल्यास सूचना प्रसिद्ध झाल्याचे दिनांक पासून **१५ दिवसांच्या आत** उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई यांच्याकडे त्यांचे हरकती बाबत लेखी कळवावे. अन्यथा त्यानंतर कुणाचेही हरकत नाही, असे समजण्यात येईल. याची कृपया संबंधितांनी या सूचनेद्वारे नोंद घ्यावी.

**दिनांक: ०९/०५/२०२६** **सही/-**
**संजय श्रीराम यादव**

**मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित**

**ई–निविदा सुचना**

मुख्य अभियंता (स्था), एमएसईबीएचसीएल, मुंबई ई– निविदा क्र. CEC/MSEBHCL/MUM/TECH/T-09/2026-27 आणि CEC/MSEBHCL/MUM/TECH/ T-10/2026-27 ला आमंत्रित करत आहेत. बिड कागदपत्रे ०९.०५.२०२६ पासून वेबसाइटवर उपलब्ध होतील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in, ई–निविदा दुव्यास https://etender.mahadis com.in ला भेट दया. फोन नं. ०२२–२२६०८३८३

**HO PR No.113/26-27 dt.08.05.26** **मुख्य अभियंता (स्थापत्य)**

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**अभिरुचि अभिव्यक्ति**

कार्यकारी संचालक (व्यवसाय व संचालन) पात्र कंपन्यांकडून विविध नवीन प्रकल्पांसाठी कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड सोबत प्रकल्प भागीदार म्हणून सहभागासाठी अभिरुची पत्र मागवित आहेत. अधिक माहितीसाठी कृपया **www.konkanrailway.com** ला भेट द्या (EOI दस्तऐवजासाठी मार्ग : **www.konkanrailway.com --> Departments -> Electrical ->Empanelled Business Associate->EOI for enlisting Companies/ Firm for project -> EOI document for Empanelment of Operation & Maintenance of Electric Loco Workshops/ Sheds, and Maintenance of 3-phase locomotives including IOH, POH and other schedules of WAP-7 & WAG-9, IOH of Motorized Bogies and Traction Motors and as specified in tender scope) प्रक्रिया शुल्क :** रु. १५,०००/- रुपये पंधरा हजार अधिक GST १८% फक्त. (परतफेड करण्यायोग्य नाही).

**SBI**
**भारतीय स्टेट बँक**
**प्रादेशिक व्यावसायिक कार्यालय – II, शीव**
बी–603 आणि 604, कोहिनूर सिटी, कमर्शिअल–1, 6वा मजला, किरोळ रोड, एलबीएस रोड, कुर्ला (प), मुंबई – 400070.

**व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंची आवश्यकता**

भारतीय स्टेट बँक बीपीसीएल रीफायनरी, माहूल, मुंबई शाखा आणि किंग सर्कल माटुंगा, मुंबई शाखा, मुंबई येथील शाखेकरिता व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंच्या मालकांकडून / मुखत्यारपत्रधारकांकडून भाडेतत्त्वावरील प्रस्ताव मागवित आहे. अधिक तपशिलांसाठी आणि बीपीसीएल आणि किंग सर्कल शाखा, मुंबई येथील शाखेसाठीचे निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी, कृपया एसबीआय वेबसाईटला **https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/prcurement-news** येथे 09/05/2026 ते 08/06/2026 दरम्यान भेट द्या. या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ **08/06/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत** असेल. या संदर्भातील पुढील **सूचना / स्पष्टीकरण** केवळ बँकेच्या उपरोक्त वेबसाईट वरच प्रकाशित केले जाईल.

**प्रादेशिक व्यवस्थापक**
**कृपया मध्यस्थांनी अर्ज करू नये.** **प्रादेशिक व्यावसायिक कार्यालय – II, शीव, मुंबई**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**
**(RFx No. 7000039627) (1st Extension)**

MSETCL invites digitally signed online bids for following tender through SRM E-tender process of MSETCL in two bid system from registered contractors, agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Tender No & Description of Work | Due date & Time (Hrs) for submission & opening of Tender |
|---|---|---|
| 1 | **Tender Ref No. CELDK/SCADA/2026/ITOTLAB/4** **Scope of Work:** Supply, Installation, Configuration, Testing and Commissioning of High-End servers for IT-OT Test Lab at MSLDC, Airoli & ALDC, Ambazari with Comprehensive Onsite warranty for the period of 5 (Five) Years. | **Download of Tender Documents** Date: From 09.05.2026 to 15.05.2026 Hrs 23:59 |

| Estimated Cost (Rs.) | EMD (Rs.) | Tender Fee (Rs)+GST @18% Extra | Closing Date (Submission) | Tender (Technical) Opening date | Commercial Opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 70,59,830/- | Rs. 70,598/- | Rs. 590/- (500 + 90 18% GST) | 15.05.2026 Up to 23:59 Hrs | 18.05.2026 11.00 AM (If possible) | 21.05.2026 11.00 AM (If possible) |

**Contact Person:** Executive Engineer (SCADA)/ Dy. Executive Engineer (SCADA)/ Assistant Engineer (SCADA), Maharashtra State Load Dispatch Centre, Thane-Belapur Road. At & Post Airoli Navi Mumbai - 400708. Tel. no. 9769213859/8879756261/8087070878

For further details visit our website **http://mahatransco.in/** or **http://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal **http://srmetender.mahatransco.in**.

**Sd/-**
**Superintending Engineer (SCADA/Admin)**
**(MSLDC) MSETCL, Airoli.**

**AMC Repo**
Safe, Secure & Stable

**AMC REPO CLEARING LIMITED**

**CIN : U65929MH2021PLC359108**
**Registered Office :** Unit No. 503, Windsor, Off CST Road, Kalina, Santacruz East, Mumbai 400098.
**Website :** www.arclindia.com

**AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2026**

The Audited Financial Results of AMC Repo Clearing Limited "The Company" along with the Auditor's Report for the Quarter and Year Ended March 31, 2026 have been reviewed by the Audit Committee and approved by the Governing Board of Directors of the Company on 07th May, 2026, in Pursuant to the Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

The aforementioned financials result for Quarter and Year Ended March 31, 2026 along with the Auditor's Report thereon is available on the website at arclindia.com/financials. The same can also be accessed by scanning the QR Code provided below:

**SCAN THE QR CODE TO VIEW THE RESULTS ON THE WEBSITE OF THE COMPANY**

**For and on behalf of Board of Directors**
**AMC Repo Clearing Limited**
**Kashinath Katakdhond**
**Managing Director**
**DIN:07716501**
**Date: 07th May, 2026**
**Place: Mumbai**

**सार्वजनिक सूचना**
( दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १३० अंतर्गत )

**श्री. जगदीशचंद्र मनसुखानी यांच्या कर्जदारांच्या निदर्शनास**

[कॉर्पोरेट कर्जदार मे. मान ट्युबिनॉक्स लिमिटेड यांचे वैयक्तिक जामीनदार]

| अ.क्र. | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक जामीनदाराचे (PG) नाव | **श्री. जगदीशचंद्र मनसुखानी** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव, पत्ता आणि सीआयएन | मे. मान ट्युबिनॉक्स लिमिटेड पत्ता: १०२, मान हाऊस, दुसरा मजला, एस.व्ही. रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५६. सीआयएन: U28112MH2006PLC285982 |
| ३. | पीजीच्या निवासस्थानाचा पत्ता | आध्या बंगला, प्लॉट क्र. ४३, एन.एस. रोड १०, जे.व्ही.पी.डी. योजना, विले पार्ले (पश्चिम), मुंबई ४०००५६. |
| ४. | निर्णय प्राधिकरणाच्या आदेशाचा तपशील | माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-II यांनी, मे. मान ट्युबिनॉक्स लिमिटेड यांचे वैयक्तिक जामीनदार श्री. जगदीशचंद्र मनसुखानी यांच्याविरुद्धची दिवाळखोरी प्रक्रिया, CP(IB) क्र. ५९३/MB/2025 अन्वये स्वीकारली आहे. |
| ५. | आयबीसी, २०१६ अंतर्गत 'पीजी' (वैयक्तिक हमीदार) संदर्भातील दिवाळखोरी प्रक्रिया सुरु होण्याची तारीख | २४/०४/२०२६ |
| ६. | बँकरप्सी ट्रस्टीचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री प्रतुल कुमार सिंह IBBI/IPA-003/435/2023-2024/14284 |
| ७. | मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या ठराव बँकरप्सी ट्रस्टीचा पत्ता आणि ई-मेल | जीए-४१, सुंदरी अपार्टमेंट, तिसरा मजला, फ्लॅट डी १२, नारायणतला पश्चिम, बागुईहाटी, कोलकाता, पश्चिम बंगाल - ७०००५९ ईमेल: ip.pratul@gmail.com |
| ८. | बँकरप्सी ट्रस्टीचे पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | फ्लॅट क्र. १०४, टॉवर १९, ट्रेझर टाउन, बिजलपूर इंदूर, मध्य प्रदेश – ४५२०१२ ईमेल: pg.jcm26@gmail.com |
| ९. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | १६/०५/२०२६ |
| १०. | संबंधित अर्ज येथे उपलब्ध आहेत: | **वेब लिंक :** https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, ' राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण ' , मुंबई खंडपीठ - II यांनी दिनांक **२४/०४/२०२६** रोजी **श्री. जगदीशचंद्र मनसुखानी [कॉर्पोरेट कर्जदार - मे. मान ट्युबिनॉक्स लिमिटेड यांचे वैयक्तिक जामीनदार]** यांच्याविरुद्ध दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**श्री. जगदीशचंद्र मनसुखानी** यांच्या कर्जदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह, नोंद क्रमांक ८ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर असलेल्या 'बँकरप्सी ट्रस्टी' यांच्याकडे दिनांक **१६/०५/२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत.

वित्तीय कर्जदात्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करावेत. इतर सर्व कर्जदाते त्यांचे दावे पुराव्यासह प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करू शकतात.

**दाव्यांच्या पुराव्यांबाबत खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास दंडास पात्र ठरले जाईल.**

**प्रतुल कुमार सिंह**
IBBI/IPA-003/435/2023-2024/14284
एएफए : ३०.०६.२०२६ पर्यंत वैध

**दिनांक: ०९/०५/२०२६**
**स्थळ: इंदूर**

# ओडिशामध्ये 'तारा' शस्त्रप्रणालीची यशस्वी चाचणी



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**ओडिशा** - 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला बळ देत भारताने संरक्षण क्षेत्रात महत्त्वाची झेप घेतली आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि भारतीय हवाई दलाने ओडिशाच्या किनारपट्टीवर 'टॅक्टिकल ॲडव्हान्स्ड रेंज ऑगमेंटेशन' (तारा) या स्वदेशी शस्त्रप्रणालीची पहिली यशस्वी चाचणी केली. 'तारा' हे एक मॉड्यूलर किट आहे. ते साध्या 'अनगाइडेड' बॉम्बला 'प्रिसिजन गाइडेड' शस्त्रात रूपांतरित करते. त्यामुळे लक्ष्यावर अधिक अचूक हल्ले करणे शक्य होते. ही भारतातील पहिली स्वदेशी 'ग्लाइड' शस्त्रप्रणाली असून, ती कमी खर्चात विकसित करण्यात आली आहे. या प्रकल्पात डीआरडीओच्या विविध प्रयोगशाळांसह देशातील संरक्षण उद्योगांनीही योगदान दिले आहे. चाचणी यशस्वी झाल्यानंतर उत्पादन प्रक्रियेलाही सुरुवात करण्यात आली आहे.

## २५० कोटींचा एलिफंटा विकास प्रकल्प कधी प्रत्यक्षात येणार?

**स्थानिक रहिवाशांचा सवाल**

■ मुंबई

**ग्राम** विकास आणि पंचायत राज समितीने नुकतीच घारापुरी बेटावर जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. यावेळी दहा वर्षांहून अधिक काळ रखडलेला एलिफंटा विकास प्रकल्प कधी सुरू होणार, असा सवाल स्थानिक रहिवाशांनी समितीच्या सदस्यांना विचारला.

एलिफंटा विकास प्रकल्पाला केंद्र सरकारने २०१५ साली मंजुरी दिली आहे. मात्र भारतीय पुरातत्त्व विभागाने (एएसआय) विकासकामांवर घातलेल्या निर्बंधांमुळे अद्याप प्रकल्पाची एक वीटही रचली गेलेली नाही, असा दावा याप्रसंगी ग्रामस्थांनी केला. सरपंच मीना मुकेश भोईर



आणि उप संरपंच बळीराम पद्माकर ठाकूर यांनी ग्रमास्थांच्या वतीने याप्रसंगी समितीला एक लेखी निवेदन दिले. या बेटावर राहणारे रहिवासी उपजिविकेसाठी मुख्यत्वे पर्यटनावर अवलंबून आहेत. मात्र एएसआयच्या निर्बंधांमुळे येथे विकासाची कोणतेही कामे गेल्या वर्षांत झालेली नाही. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळत नाही, असे निवेदनात म्हटले आहे. घारापुरी बेटावरील शेतबंदर, राजबंदर आणि मोराबंदर येथील रहिवासी पर्यटन आणि त्याच्याशी संबंधित छोट्या छोट्या व्यवसायांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. एएसआयच्या निर्बंधांमुळे विकास प्रकल्प गेली दहा वर्षे रखडला आहे. त्यामुळे याप्रश्नी समितीने हस्तक्षेप करावा आणि एएसआयचे निर्बंध रद्द किंवा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## ड्रग प्रकरणी सलीम डोलाला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** ड्रग प्रकरणात अटक आरोपी सलीम डोला याला मुंबईतील किल्ला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. याप्रकरणी आज पुन्हा सलीम डोलाला न्यायालयात हजर केले होते. यावेळी नार्को टिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी)ने तपास पूर्ण झाल्याचे सांगत पुढील कोठडीची आवश्यकता नसल्याचे न्यायालयात स्पष्ट केले. त्यानंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

या सुनावणीदरम्यान सलीम डोलाच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, आर्थर रोड कारागृहात त्याच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्याला अन्य कोणत्याही कारागृहात ठेवण्यात यावे. यावेळी वकिलांनी भायखळा, ठाणे किंवा तळोजा कारागृहात हलवण्याचा पर्यायही सुचवला.

मात्र, यावर अंतिम निर्णय न्यायालय प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडून घेतला जाणार आहे. या प्रकरणात आरोपीचा संबंध अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी जोडला जात असल्याच्या चर्चांवरही बचाव पक्षाने आक्षेप घेतला. तपासात दाऊद इब्राहिमशी कोणताही थेट संबंध आढळलेला नाही.

## मुंबई विद्यापीठाच्या विधि विषयातील दोन महत्त्वाच्या परीक्षा एकाच दिवशी

■ मुंबई

**विधि** शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. मुंबई विद्यापीठाची एलएलएम प्रवेशासाठीची सीईटी आणि बार कौन्सिल ऑफ इंडियामार्फत घेतली जाणारी अखिल भारतीय बार परीक्षा या दोन्ही परीक्षा ७ जून रोजी एकाच दिवशी होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. वकिली व्यवसायासाठी आवश्यक असलेली अखिल भारतीय बार परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच उमेदवारांना प्रत्यक्ष वकिली करण्यासाठी परवाना मिळतो. दुसरीकडे, पदव्युत्तर शिक्षणासाठी एलएलएम प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सीईटी परीक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्याने विद्यार्थ्यांना एकाच परीक्षेची निवड करावी लागणार आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने फेब्रुवारीमध्येच ७ जून रोजी परीक्षा होणार असल्याची घोषणा करत नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. त्यानुसार अनेक विद्यार्थ्यांनी तयारीही सुरू केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी मुंबई विद्यापीठानेही एलएलएम सीईटीची परीक्षा त्याच दिवशी जाहीर केली.

या निर्णयामुळे मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विधि पदवीधर विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वकिली व्यवसायासोबतच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसणार आहे. त्यामुळे एलएलएम सीईटी परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून जोर धरत आहे.

## ओबीसींचा जनगणनेवर बहिष्कार घराघरावर विरोधाच्या पाट्या

■ भंडारा

**जनगणनेत** ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याच्या निषेधार्थ भंडारा जिल्ह्यात ओबीसी बांधव आक्रमक झाले आहेत. सकल ओबीसी समाज आणि ओबीसी संघर्ष समितीने केंद्र सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला असून, जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील प्रश्न क्रमांक १२ मध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि सामान्य प्रवर्गाचा उल्लेख आहे. मात्र इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याने ओबीसी बांधवांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम का नाही? असा सवाल उपस्थित करत, या निर्णयाविरोधात आंदोलन छेडण्यात आले आहे. ओबीसी संघर्ष समितीचे कार्यकर्ते आता घरोघरी जाऊन, आमचा जनगणनेत सहभाग नाही असे लिहिलेली पोस्टर लावत आहेत. या माध्यमातून जनगणनेवर बहिष्काराची भूमिका मांडली जात आहे. जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना दिला जात नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. ११ मेपासून भंडारा जिल्ह्यात बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर हिंदी फलक

**स्थानिकांचा विरोध**

■ रायगड

**मुंबई-गोवा** राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू असताना नवा भाषावाद उफाळून आला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडून रायगड जिल्ह्यात लावण्यात आलेल्या दिशादर्शक फलकांवर मराठी भाषा गायब असून केवळ हिंदीचा वापर करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

पेण, वडखळ व डोलवी या आगरी-कोळी बांधवांची मोठी वस्ती असलेल्या भागांत नव्याने लावलेल्या फलकांवर 'गलत दिशा में वाहन ना चलाएं' आणि 'लेन में वाहन चलाएं' अशा हिंदीतील सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात स्थानिक भाषा मराठी असताना हिंदीचा वापर केल्यामुळे हा मराठीचा अपमान असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक ग्रामस्थ व उबाठा पदाधिकाऱ्यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी दर्शवली आहे. आमच्या भागात हिंदी लादण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही. तात्काळ हिंदी फलक हटवून मराठीत फलक लावावेत, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात भाषिक अस्मितेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.




## गोवंडीतील शाळेत शिपायाकडून ६ वर्षीय विद्यार्थ्यासोबत गैरवर्तन

■ मुंबई

**मुंबईतील** गोवंडी परिसरातील एका खाजगी शाळेतील शिपायाने ६ वर्षीय विद्यार्थ्यासोबत गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी राजेश महाकाळ या ४५ वर्षीय शिपायाला अटक करून त्याच्यावर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे पालकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

आरोपी राजेश महाकाळ हा संबंधित शाळेत शिपाई म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर मागील वर्षभरापासून तो ६ वर्षीय विद्यार्थ्यासोबत गैरवर्तन करत असल्याचा आरोप झाला आहे. शाळेतील रिकाम्या खोलीत नेऊन आरोपी विद्यार्थ्यासोबत गैरकृत्य करत असल्याची माहिती आहे. पीडित विद्यार्थ्याने अखेर हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला. मुलाकडून घडलेला प्रकार ऐकताच पालकांना धक्का बसला. त्यांनी तातडीने गोवंडी पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपीविरोधात तक्रार दाखल केली. पालकांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीविरोधात गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. गोवंडी पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

शाळेतील इतर कर्मचारी, शिक्षक तसेच प्रशासनाचीही चौकशी केली जाणार आहे. मात्र शाळा प्रशासनाने या घटनेबाबत प्रतिक्रिया दिलेली नाही.

## अभ्युदयनगरच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा ६४१ चौरस फुटांची सदनिका मिळणार

■ मुंबई

**अभ्युदयनगर** या महाराष्ट्र क्षेत्र विकास व गृहनिर्माण मंडळाच्या (म्हाडा) वसाहतीच्या समूह पुनर्विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या पुनर्विकास कामासाठी म्हाडाने एमजीएन ॲग्रो प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड, एनएनपी बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड आणि ओनेस्ट शेल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांच्या कन्सॉर्टियमला नुकतेच स्वीकृती पत्र दिले आहे. या प्रकल्पात रहिवाशांना २०५ चौरस फुटांच्या घराच्या बदल्यात ६४१ चौरस फुटाची सदनिका मिळणार आहेत.

या पुनर्विकास प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाने २७ फेब्रुवारी २०२४ मध्ये मंजुरी दिली होती. त्यानंतर गृह विभागाने ६ मार्च रोजी यासंबंधीचा शासन निर्णय जारी केला होता. अभ्युदय नगर ही वसाहत ३३ एकर भूखंडावर वसलेली आहे. त्यामध्ये ४८ इमारती असून प्रत्येकी सुमारे २१० चौरस फुटांची ३,४१० घरे आहेत. त्यापैकी ३,३३५ रहिवासी तर ७५ बिगर रहिवासी गाळे आहेत. या वसाहतीचा समूह पुनर्विकास करण्याची जबाबदारी सरकारने म्हाडावर सोपवली आहे.

याआधी या पुनर्विकास प्रकल्पाला विकासकांकडून प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यानंतर ११ एप्रिल २०२५ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली.

या बैठकीला अभ्युदयनगर फेडरेशनचे प्रतिनिधी आणि म्हाडाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत निविदेबाबतच्या अटींमध्ये सुधारणा करून नव्याने निविदा मागवण्यात आल्या. सुधारित अटींमध्ये प्रत्येक घरासाठी ५ लाख रुपयांचा कॉर्पस फंड आणि महिना पंचवीस हजार रुपये भाडे विकासकाने द्यायचे या अटींचा समावेश आहे.

## नगरपरिषद-नगरपंचायतींच्या पोटनिवडणुका जाहीर

**२० जूनला मतदान**

■ मुंबई

**राज्य** निवडणूक आयोगाने राज्यातील विविध नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील रिक्त पदांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकांमध्ये अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेची अध्यक्षपदासह २० सदस्यांसाठी संपूर्ण निवडणूक होणार असून, इतर अनेक ठिकाणी पोटनिवडणुका पार पडणार आहेत.

निवडणूक कार्यक्रमानुसार, १२ मे रोजी अधिसूचना जाहीर होणार आहे. १८ मे ते २५ मे दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. २६ मे रोजी अर्जांची छाननी होईल, तर २७ मे ते २ जून या कालावधीत अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. मतदान २० जून रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० दरम्यान पार पडणार असून, २१ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. उमेदवारांच्या निधनामुळे स्थगित झालेल्या मनमाड, पिंपळनेर, गेवराई आणि अकोट या नगरपरिषदांमधील प्रत्येकी एका प्रभागासाठीही मतदान होणार आहे.

## पत्नीची हत्या केल्याच्या गुन्ह्यात पतीला ७४ व्या वर्षी जन्मठेप

■ पुणे

**चारित्र्याच्या** संशयावरून पत्नीची अत्यंत निर्दयपणे हत्या केल्याप्रकरणी पुणे न्यायालयाने आरोपीला त्याच्या वयाच्या ७४ व्या वर्षी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तसेच ५ हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास आणखी सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षाही न्यायालयाने सुनावली. रामचंद्र शेहू चव्हाण असे आरोपीचे नाव आहे. तो भारती विद्यापीठ परिसरात राहतो. रामचंद्रला आपल्या पत्नीचे अन्य पुरुषाशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता.

नवाकाळ विजय

उद्या वाचा

चिनी 'मायाजालात' अडकली हतबल अमेरिका



काँग्रेसने संधी गमावली

'राजशिष्टाचार' फेररचनेचा अन्वयार्थ

## बंगालात निकालानंतर एसआयआर अपीलीय अधिकाऱ्याचा राजीनामा

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर तीनच दिवसांत कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश टी. एस. शिवज्ञानम यांनी राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाबाबत अपीलांच्या सुनावणीसाठी नेमलेल्या अपीलीय न्यायाधिकरणाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी वैयक्तिक कारणास्तव आपण पदाचा राजीनामा दिल्याचे सांगितले आहे. मात्र, या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा पराभव होऊन भाजपा राज्याची सूत्रे हाती घेण्यास सज्ज झाला असतानाच त्यांनी राजीनामा दिल्याने त्याची चर्चा होत आहे. मार्च महिन्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भारतीय निवडणूक आयोगाने अपीलीय न्यायाधिकरण म्हणून अधिसूचित केलेल्या १९ सेवानिवृत्त न्यायाधीशांमध्ये न्यायमूर्ती शिवज्ञानम यांचा समावेश होता. पश्चिम बंगाल निवडणुकांपूर्वी ३४ लाखांहून अधिक मतदारांना मतदार यादीतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तो कायम ठेवण्याच्या न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात या मतदारांनी अपील केले होते.

